पाहिजेत
ITI इलेक्ट्रिशीयन/वायरमन,
12 वी पास पाहिजेत
नामांकित कंपनी साठी सबस्टेशन कामासाठी शिक्षण ITI इलेक्ट्रिशीयन/ वायरमन, 12 वी पास फ्रेश/ अनुभवी मुले त्वरित पाहिजे.
संपर्क - 9923155996

दैनिक सोलापूर
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक
# कटूसत्य
किंमत ५ रुपये
Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com

व्यवसाय
आपण ज्येष्ठ, सेवानिवृत्त, गृहिणी आहात का?
आपला वेळ, शिक्षण यांचा उपयोग करून नामाकित कंपनीत आपल्याला वेळेत कामाची सुवर्णसंधी!
निश्चित उत्पन्न ■ कोणतीही गुंतवणूक नाही
संपर्क : 8087459854

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक २५३ वा | मंगळवार, दि. १९ मे २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

# कांद्याला २४०० रुपये प्रतिक्विंटल दर द्या

## अन्यथा २६ मे रोजी मुंबई-आग्रा महामार्ग रोखणार

**लासलगाव (कटूसत्य वृत्त):-** लासलगाव येथे कांद्याला मिळत असलेल्या अत्यल्प दराविरोधात शेतकऱ्यांनी एल्गार आंदोलन छेडले. आमदार रोहित पवार यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनात शेतकऱ्यांनी गळ्यात कांद्याच्या माळा घालून सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी केली.

कांद्याला किमान २४०० रुपये प्रतिक्विंटल हमीभाव देऊन शासनाने थेट बाजार समित्यांमधून खरेदी करावी, अशी मागणी करण्यात आली. येत्या आठ दिवसांत याबाबत निर्णय न झाल्यास २६ मे रोजी चांदवड येथे मुंबई-आग्रा महामार्गावर रास्ता रोको आंदोलन करण्यात येईल, असा इशारा रोहित पवार यांनी दिला. तसेच महाराष्ट्रातील शेतीमाल दिल्लीला जाऊ दिला जाणार नाही आणि कांदा उत्पादकांवर होणारा अन्याय सहन केला जाणार नाही, असेही त्यांनी







स्पष्ट केले.

या आंदोलनात खासदार भास्कर भगरे, खासदार निलेश लंके, जयदत्त होळकर, सोनिया होळकर, तानाजी आंधळे, प्रवीण कदम, माणिकराव शिंदे, दत्तात्रय पाटील, शिवा सुरासे, संदीप दरेकर, छबुराव जाधव, राजेंद्र बोरगुडे, महेश पठाडे, बाळासाहेब दराडे, रमेश पालवे यांच्यासह हजारो शेतकरी सहभागी झाले होते.

यावेळी बोलताना रोहित पवार यांनी सध्याच्या कांद्याच्या दरांवर तीव्र नाराजी व्यक्त केली. शेतकऱ्यांना केवळ पाच ते सहा रुपये किलो दर मिळत असल्याने अनेक शेतकरी नैराश्यात असल्याचे त्यांनी सांगितले. धरणगाव खडक येथील शेतकरी विश्वनाथ उशीर यांनी नैराश्यातून आत्महत्या केल्याचा उल्लेख करत त्यांनी शेतकऱ्यांनी टोकाचे पाऊल उचलू नये, असे आवाहन केले.

केंद्र आणि राज्य सरकारवर टीका करताना त्यांनी सत्ताधाऱ्यांशी संबंधित प्रोड्युसर कंपन्यांना फायदा व्हावा म्हणून कांद्याचे भाव पाडले जात असल्याचा आरोप केला. तसेच शेतीचे ज्ञान नसलेल्या व्यक्तींना कांदा अभ्यास समितीचे अध्यक्ष करण्यात आल्याचाही त्यांनी निषेध केला.

मुख्यमंत्री फक्त ट्विट करून प्रश्न सुटत नाहीत. त्यांनी प्रत्यक्ष बाजार समित्यांमध्ये जाऊन शेतकऱ्यांच्या समस्या जाणून घ्याव्यात, असेही रोहित पवार यांनी म्हटले. इराण प्रश्नावर केंद्र सरकारच्या भूमिकेमुळे इंधन संकट निर्माण होत असल्याची टीकाही त्यांनी केली.

कांद्याला ३ हजार रुपये प्रतिक्विंटल दर देऊन शासनाने थेट खरेदी करावी, तसेच मागील कांदा अनुदानातील उर्वरित १५० रुपये प्रतिक्विंटल रक्कम तातडीने शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करावी, अशी मागणीही त्यांनी केली.

आंदोलनापूर्वी रोहित पवार, खासदार भास्कर भगरे, जयदत्त होळकर, संदीप दरेकर, सोनिया होळकर आणि सचिव नरेंद्र वाढवणे यांनी लासलगाव बाजार समितीत भेट देत कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या अडचणी जाणून घेतल्या.

खासदार निलेश लंके यांनी शासनाची धोरणे शेतकरीविरोधी असल्याचा आरोप करत कांदा उत्पादकांनी आता रस्त्यावर उतरून ताकद दाखवण्याची वेळ आल्याचे सांगितले. तर खासदार भास्कर भगरे यांनी गेल्या काही वर्षांत शासनाने २२ वेळा कांदा निर्यातबंदी केली असल्याचे सांगत जानेवारी ते मे अखेरपर्यंत विक्री झालेल्या कांद्याला दीड हजार रुपये प्रतिक्विंटल अनुदान द्यावे, अशी मागणी केली.

दरम्यान, आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर तहसीलदार विशाल नाईकवाडे, निफाडचे पोलिस उपअधीक्षक के. के. पाटील आणि सहाय्यक पोलिस निरीक्षक दीपक पाटील यांच्या नेतृत्वाखाली मोठा पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

# विधानपरिषदेच्या १६ जागांसाठी निवडणूका

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र विधानपरिषदेच्या द्वैवार्षिक निवडणुकांची घोषणा करण्यात आली असून १६ जागांसाठी निवडणूक कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. या सर्व १६ जागा या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मतदारसंघातील असून या जागांसाठी १८ जून रोजी मतदान होणार आहे. या निवडणुकीसाठी अर्ज भरण्याची मुदत २५ मे ते १ जून असणार आहे, तर अर्जांची छाननी २ जून रोजी होणार आहे. या निवडणुकीसाठी २२ जून रोजी मतमोजणी होणार आहे. महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लांबल्याने या मतदारांतून होणाऱ्या विधानपरिषदेच्या निवडणुकाही लांबल्या होत्या. मात्र स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका काही दिवसांपूर्वी पार पडल्याने विधानपरिषदेच्या या १६ जागांसाठीच्या निवडणुकीचा मार्ग मोकळा झाला आहे.



### कोणकोणत्या मतदारसंघांसाठी होणार निवडणूक?

सोलापूर, अहिल्यानगर, ठाणे, जळगाव, सांगली-सातारा, नांदेड, यवतमाळ, पुणे, भंडारा-गोंदिया, रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग, नाशिक, वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली, अमरावती, धाराशिव-लातूर-बीड, परभणी-हिंगोली आणि छत्रपती संभाजीनगर-जालना

### दहा विधानपरिषद सदस्यांना शपथ

काही दिवसांपूर्वीच विधानसभा सदस्यांच्या मतदानावर होणाऱ्या विधानपरिषदेच्या ९ जागांवरील निवडणूक पार पडली. विधान परिषदेच्या द्विवार्षिक निवडणुकीत बिनविरोध निवड झालेले नऊ आणि पोटनिवडणुकीत विजयी झालेल्या एक अशा दहा सदस्यांचा शपथविधी गुरुवारी सकाळी विधान भवनाच्या मध्यवर्ती सभागृहात पार पडला. परिषदेचे सभापती राम शिंदे यांनी या सदस्यांना शपथ दिली. या वेळी विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सुनेत्रा पवार उपस्थित होते.

बिनविरोध निवड झालेल्या सदस्यांमध्ये भाजपचे प्रमोद जठार, माधवी नाईक, सुनील कर्जतकर, विवेक कोल्हे, संजय भेंडे. शिवसेनेच्या नीलम गोऱ्हे, बच्चू कडू, शिवसेना उबाठा पक्षाचे अंबादास दानवे आणि राष्ट्रवादी काँग्रेसकडून झिशान सिद्दीकींचा समावेश आहे. प्रज्ञा सातव यांनी काँग्रेस पक्षातून राजीनामा दिल्यानंतर रिक्त जागेसाठी पोटनिवडणूक घेतली होती. भाजपमध्ये प्रवेश केल्यानंतर सातव यांनाच ती जागा देण्यात आली.

# मोटेगावकरने स्वतःच्या मुलासाठी NEET पेपर फोडला?

## CBI तपासात धक्कादायक माहिती समोर

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** देशभरात खळबळ उडवून देणाऱ्या 'नीट' (NEET) पेपरफुटी प्रकरणात अत्यंत धक्कादायक माहिती समोर आली आहे. लातूरमधील नामांकित 'आरसीसी' (RCC) कोचिंग इन्स्टिट्यूटचा संचालक शिवराज मोटेगावकर याला दिल्लीच्या विशेष न्यायालयाने ९ दिवसांची सीबीआय कोठडी सुनावली आहे.

तत्पूर्वी सीबीआयने ताब्यात घेतल्यानंतर गेल्या दोन दिवसांच्या




कसून चौकशीत मोटेगावकरच्या विरोधात अत्यंत भक्कम आणि महत्त्वाचे पुरावे हाती लागले आहेत. अधोरेखित करण्यासारखी बाब म्हणजे शिवराज मोटेगावकर याने स्वतःच्या मुलासाठी ठएएळ पेपर फोडल्याचा संशय सीबीआयला आहे.

### स्वतःच्या मुलासाठी पत्करला एवढा मोठा धोका?

सीबीआय सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, यावर्षी शिवराज मोटेगावकर याचा स्वतःचा मुलगा देखील बारावीत होता आणि त्याने नीटची परीक्षा दिली होती. त्यामुळे मोटेगावकराने स्वतःच्या मुलाला वैद्यकीय प्रवेशासाठी जास्तीत जास्त गुण मिळावेत, याच उद्देशाने नीटचा पेपर फोडला असावा, यादृष्टीने सीबीआय आता कसून तपास करत आहे. मुलाच्या भविष्यासाठी आणि त्याला डॉक्टर बनवण्यासाठीच मोटेगावकराने पेपरफुटीसारखा एवढा मोठा कायदेशीर धोका पत्करल्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे.

### लातूरमधील घरात सीबीआयला सापडला महत्त्वाचा पुरावा

सीबीआयने लातूर येथे केलेल्या तपासादरम्यान शिवराज मोटेगावकर याच्या घरावर छापा टाकला होता. या झाडाझडतीत सीबीआयला त्याच्या घरातून 'केमिस्ट्री' (रसायनशास्त्र) विषयाची नीट परीक्षेची मूळ प्रश्नपत्रिका हस्तगत करण्यात यश आले. दोन दिवसांपूर्वी लातुरात प्रा. कुलकर्णी याला सीबीआयने अटक केली. एनटीएमध्ये (परीक्षा प्रक्रिया) कुलकर्णी याच्याकडे महत्त्वाची जबाबदारी होती. त्यानेच ही प्रश्नपत्रिका मोटेगावकर याला दिल्याचा संशय आहे. दुसरीकडे मोटेगावकर याच्या घरातच थेट प्रश्नपत्रिका सापडल्याने त्याचा या पेपरफुटीतील थेट सहभाग आता उघड झाला असून त्याच्या अडचणीत मोठी वाढ झाली आहे.

### परीक्षेआधीच प्रश्नपत्रिका मिळाली, पालकांकडून उकळले लाखो रुपये?

स्वतःच्या मुलासाठी प्रश्नपत्रिका मिळवल्यानंतर मोटेगावकरने याचा व्यावसायिक फायदा उठवल्याचा संशय सीबीआयला आहे. आपल्याकडे आलेल्या या प्रश्नपत्रिकेच्या आधारे त्याने लातूर आणि परिसरातील इतर गरजू विद्यार्थ्यांच्या पालकांशी संपर्क साधला. मुलांना नीट परीक्षेत हमखास यश मिळवून देतो, असे आमिष दाखवून त्याने अनेक पालकांकडून लाखो रुपये उकळल्याचा संशय सीबीआयला आहे.

### सीबीआय कोठडीत मोठे खुलासे होण्याची शक्यता

न्यायालयाने ९ दिवसांची सीबीआय कोठडी सुनावल्यामुळे आता सीबीआय मोटेगावकरची दिल्लीत कसून चौकशी करत आहे. या ९ दिवसांच्या काळात त्याने हा पेपर नेमका कोणाकडून मिळवला? या रॅकेटमध्ये दिल्ली, राजस्थान किंवा इतर राज्यातील कोणत्या मोठ्या टोळ्यांचा हात आहे? आणि लातूरमधील आणखी किती पालकांनी त्याला पैसे दिले होते? अशा सर्व प्रश्नांचा खुलासा होणार आहे.

# देवदर्शनासाठी जाताना काळाचा घाला

## दीड वर्षाच्या चिमुकल्यासह २ महिलांचा मृत्यू

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** पुणे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरील कोंडी (ता. उत्तर सोलापूर) येथे सोमवारी (दि.१८) पहाटे झालेल्या भीषण अपघातात दीड वर्षाच्या चिमुकल्यासह दोन महिलांचा जागीच मृत्यू झाला.

या दुर्घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. अपघातात अन्य दोघेजण गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार,



पुण्यावरून अक्कलकोट येथे देवदर्शनासाठी जाणारे कुटुंब पहाटे सहा ते सव्वासहा वाजण्याच्या सुमारास कोंडी परिसरातून जात असताना त्यांच्या कारची ट्रकला जोरदार धडक झाली. अपघात इतका भीषण होता की कारमधील तिघांचा जागीच मृत्यू झाला.

या दुर्घटनेत सिंधू रवी खंडागळे (वय ४२), नंदा भाऊराव हताळकर (वय ४५) आणि दीड वर्षाचा रुद्राक्ष यांचा मृत्यू झाला आहे. तर रुद्राक्षचे वडील यांच्यावर छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालयात उपचार सुरू असून, त्याच्या आईवर खासगी रुग्णालयात उपचार करण्यात येत आहेत.

घटनेची नोंद सिव्हिल पोलिस चौकीत करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे.

# उजनीच्या कालव्यात पोहताना दोघांचा मृत्यू

**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** ढोकबाभूळगाव (ता. मोहोळ) येथील उजनीच्या डाव्या कालव्यात पोहण्यासाठी गेलेले फरशी बसविणारे कारागीर शनिवारी (ता. १६) वाहून गेले होते. अखेर रविवारी (ता. १७) त्यांचे मृतदेह कालव्याच्या पाण्यावर तरंगताना आढळून आले.

पोलिस प्रशासनाने व गावकऱ्यांच्या मदतीने ते मृतदेह पाण्याबाहेर काढण्यात आले. उत्तरीय तपासणीनंतर ते त्यांच्या मूळ गावी पाठवल्याची माहिती पोलिस निरीक्षक बाजीराव पोवार यांनी दिली.



शनिवारी दुपारी अडीच वाजता ढोकबाभूळगाव येथे कारागीर शशिकांत रोहिदास चोपडा व बाबूलाल हेमराज चोपडा (दोघे रा. खेतडा, राजस्थान) हे चौधरी वस्तीजवळील उजनी डाव्या कालव्यात अन्य दोघा साथीदारांसमवेत पोहण्यासाठी गेले. कालव्याच्या खोलीचा अंदाज दोघांनाही आला नाही. ते वाहून गेले होते. काल रात्री उशिरापर्यंत त्यांचा शोध लागला नव्हता. रविवारी सकाळी जीवरक्षक पथक येणार होते. मात्र, सकाळी साडेसहाच्या सुमारास काही नागरिकांना एकाचा मृतदेह पाण्यावर फुगून तरंगताना आढळून आला, तर दुसऱ्याचा आठ वाजता फुगून वर येऊन तरंगताना आढळला.

गावकरी व पोलिस पाटलांनी स्थानिकांच्या मदतीने मृतदेह पाण्याबाहेर काढून उत्तरीय तपासणीसाठी मोहोळ येथील ग्रामीण रुग्णालयात पाठविले. त्यानंतर ते दोन मृतदेह पोलिस प्रशासनाने त्यांच्या मूळ गावी पाठवले. या घटनेची नोंद मोहोळ पोलिसात झाली आहे.

# अध्यक्ष ST ने, तर उपाध्यक्ष, सीईओ सायकलवरून पोचले ZPत

## महापौर-उपमहापौर इलेक्ट्रीक वाहनाने महापलिकेत दाखल

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत सोलापूर जिल्हा परिषद आणि महापालिकेने प्रत्येक सोमवारी 'नो व्हेईकल डे' साजरा केला आहे. त्यानुसार महापौर विनायक कोंड्याल आणि उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर हे इलेक्ट्रीक गाडीवरून महापालिकेत, तर जिल्हा परिषदेचे अध्यक्ष दीपक वैद्य हे एसटी बसने आणि उपाध्यक्ष इंद्रजीत पवार आणि जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन हे सायकलीने जिल्हा परिषदेत दाखल झाले.

इराण विरुद्ध अमेरिका, इस्त्राईल युद्धामुळे जगातील अनेक देशांत



इंधन तुटवडा जाणवत आहे. तसेच महागाई वाढण्याची चिन्हे आहेत, या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी इंधन बचत, परदेश दौरे आणि सोने चांदी खरेदी टाळण्याचे आवाहन केले होते. त्यानुसार भाजप नेत्यांकडून मोदींच्या आवाहनाला प्रतिसाद दिला आहे.

मोदींच्या आवाहनाला प्रतिसाद देताना सोलापूर महापालिका आणि जिल्हा परिषदेने प्रत्येक सोमवारी 'नो व्हेईकल डे' पाळण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार आज सोलापूर जिल्हा परिषदेचे अध्यक्ष दीपक वैद्य हे बार्शी तालुक्यातील आपल्या गावावरून बार्शी शहरात इलेक्ट्रीक दुचाकीने दाखल झाले, त्यानंतर ते एसटी बसने सोलापुरात दाखल झाले.

उपाध्यक्ष इंद्रजीत पवार आणि जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन हे सायकलवरून जिल्हा परिषदेत दाखल झाले.

याशिवाय अनेक विभागाचे प्रमुखही सायकल आणि इलेक्ट्रीक दुचाकीवरून आपापल्या कार्यालयात पोचले होते. त्यामुळे सोलापूर झेडपी पदाधिकारी आणि आधिकाऱ्यांनी 'नो व्हेईकल डे' यशस्वी करून पर्यावरण संवर्धन, प्रदूषणमुक्त आणि इंधन बचतीचा सोमवारी करून दाखवला आहे.

महापालिकेत 'नो व्हेईकल डे' उपक्रम राबविण्यात आला. त्यानुसार महापौर विनायक कोंड्याल, उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर हे आज ई-बाईकवरून महापालिकेत दाखल झाले होते, तर सभागृह नेते नरेंद्र काळे हे सायकलवरून सभागृहात आले होते. अधिकारीही सायकल आणि ई-बाईकवरून आले होते.

# भत्ते रखडल्याने चालक-वाहक संकटात

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एस.टी.) चालक व वाहकांना कमी वेतनात संसाराचा गाडा ओढावा लागत असतानाच आता त्यांच्या हक्काचे विविध भत्ते आणि वैद्यकीय बिले रखडल्याने आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत आहे.

हजेरी प्रोत्साहन भत्ता, शिलाई भत्ता तसेच वैद्यकीय बिलांची थकबाकी तातडीने अदा करावी, या मागणीसाठी सेवा शक्ती संघर्ष एस.टी. कर्मचारी संघाने सोलापूर विभाग नियंत्रकांना निवेदन दिले आहे.



गेल्या काही महिन्यांपासून सण-उत्सव, यात्रा आणि लग्नसराईच्या गर्दीच्या काळात एस.टी. कर्मचाऱ्यांनी कोणतीही रजा न घेता प्रवाशांची सेवा सुरळीत ठेवण्यासाठी अहोरात्र कर्तव्य बजावले. वैयक्तिक आणि कौटुंबिक जबाबदाऱ्या बाजूला ठेवून महामंडळाच्या हितासाठी काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांनाच आता त्यांच्या हक्काच्या रकमेपासून वंचित राहावे लागत असल्याने नाराजीचा सूर उमटत आहे.

या निवेदनाच्या प्रती कामगार अधिकारी (राज्य परिवहन, सोलापूर) तसेच सुरक्षा व दक्षता अधिकारी यांनाही पाठवण्यात आल्या आहेत. त्यामुळे आता सोलापूर विभाग प्रशासन कर्मचाऱ्यांच्या मागण्यांवर काय निर्णय घेते आणि थकीत रकमा कधी अदा होतात, याकडे एस.टी. महामंडळाच्या कर्मचाऱ्यांचे लक्ष लागले आहे. (पान 2 वर..)

## संपादकीय

# चिंताजनक 'हवा'

पश्चिम आशियातील युद्धाचे ढग पुरते विरळ झालेले नसताना आणि त्यामुळे इंधन संकटापासून अर्थव्यवस्थेपर्यंत त्याचा फटका सहन करावा लागत असताना; तसेच देशातील बहुतांश भाग चाळीस अंश तापमानाने भाजून निघत असताना, यंदा मान्सून केरळ किनारपट्टीवर तुलनेने लवकर (म्हणजे एक जूनच्या ऐवजी २६ मे रोजी) थडकणार, ही बातमी खरे तर दिलासादायक ठरायला हवी. मात्र, त्याच वेळी मान्सूनवर विपरीत परिणाम करणारा 'एल निनो'नामक घटकही आधीच्या अंदाजापेक्षा लवकर सक्रिय होणार असल्याने दिलासा वाटण्याऐवजी चिंता वाढली आहे.

जून ते सप्टेंबर दरम्यान हमखास पडणारा मोसमी पाऊस म्हणजेच मान्सून हे भारताचे ठळक वैशिष्ट्य. आजही देशाची अर्थव्यवस्था मोठ्या अंशी मान्सूनवरच अवलंबून आहे. सागरी पृष्ठभागाचे तापमान, तेथील दाब, वारा आदी विविध घटकांवर असलेला पाऊस हवामानाप्रमाणेच लहरी. त्यामुळे तो कधी जोरात बरसतो, तर कधी पाठ फिरवतो. तो जोरात झाल्यास शेतात आणि बाजारपेठेत चैतन्य निर्माण होते; अन पुरेसा न झाल्यास तोंडचे पाणी पळते.

यंदाच्या मान्सूनवर सावट आहे, ते 'एल निनो'चे. प्रशांत महासागराच्या पृष्ठभागाचे तापमान वाढल्यामुळे हा घटक सक्रिय होतो आणि त्यामुळे दक्षिण अमेरिकेत अतिवृष्टीची, तर भारतात अवर्षणाची शक्यता निर्माण होते. या वर्षी 'एल निनो' सक्रिय होणार याची कल्पना असल्याने हवामान विभागाने आधीच 'दीर्घकालीन सरासरी'पेक्षा कमी म्हणजे ९२ टक्के पावसाचा अंदाज वर्तविला आहे. हा 'एल निनो' जूनमध्येच सक्रिय होणार असल्याने आणि प्रशांत महासागराचा पृष्ठभाग दोन अंश सेल्सिअसपेक्षाही अधिक तापण्याची भीती असल्याने अवर्षणाची शक्यता आणखी वाढली आहे. त्यामुळे यंदाचा पावसाळा चिंताजनक आणि आव्हानात्मक असू शकतो.

विषुववृत्तीय प्रशांत महासागराच्या पृष्ठभागाचे तापमान सरासरीपेक्षा ०.५ अंश सेल्सिअसने अधिक असल्याकडे हवामान शास्त्रज्ञ लक्ष वेधत आहेत. हे वाढीव तापमान म्हणजे 'एल निनो' अपेक्षेहून अधिक लवकर सक्रिय होण्याचे लक्षण. आधीच्या वर्षातील तापमान कमी होण्याचे आणि ते परत वाढण्याचे चक्र यंदा अधिक वेगाने फिरत असून, ही असामान्य घटना असल्याचे मानले जाते. याचा अर्थ 'एल निनो' अधिक तीव्र असणार. प्रशांत महासागराच्या पृष्ठभागाचे तापमान १.५ अंश सेल्सिअसहून अधिक झाल्यास 'एल निनो' तीव्र झाला, असे मानले जाते. त्या स्थितीस 'सुपर एल निनो'ही म्हणतात. ही घटना प्रशांत महासागरातील असली, तरी तिचे हवामानशास्त्रीय परिणाम साऱ्या जगावर होतात. यामुळे दक्षिण अमेरिकेतील देशांत अतिवृष्टी होऊन पूर येण्याची, त्यात पिके वाहण्याची आणि मानवी संकट गडद होण्याची भीती असते; तर भारतात मोसमी पाऊस कमी होतो, अनेक ठिकाणी तो बरसतच नाही, तापमान वाढते; त्यामुळे पाण्याच्या दुर्भिक्ष्याची, पिके न येण्याची आणि महागाईची शक्यता अधिक असते. या शक्यता लक्षात घेऊन उपाययोजना आखण्याची आवश्यकता आहे. आपल्याकडे आपत्कालीन उपायांबद्दल भरभरून बोलले जात असले आणि कागदावर योजना आखल्या गेल्या असल्या, तरी प्रत्यक्षात त्यांची व्यवस्थित अंमलबजावणी होत नाही, असा आजवरचा अनुभव आहे. या पार्श्वभूमीवर 'एल निनो'मुळे येऊ घातलेल्या संकटाकडे पाहावे लागेल.

दहा वर्षांपूर्वी म्हणजे २०१५-१६ या काळात 'एल निनो'चा प्रभाव होता आणि त्यामुळे एकूण सरासरीच्या ८६ टक्केच पाऊस झाला होता. त्या वेळी महाराष्ट्रात, विशेषतः मराठवाड्यात खूपच कमी पाऊस झाला होता. पाण्याचे मोठे संकट निर्माण झाले होते. त्या वेळी लातूरला रेल्वेने पाणी पुरवण्याची वेळ आली होती. २०२३मध्येही 'एल निनो' होता; त्या वेळी ऑगस्ट महिन्यातील पावसावर मोठा परिणाम झाला होता. त्या महिन्यात ३६ टक्के पाऊस कमी झाला होता. हा अनुभव लक्षात घेऊन धोरणकर्त्यांना उपाय योजावे लागतील. प्रशांत महासागराप्रमाणेच हिंदी महासागराच्या तापमानाचाही मान्सूनवर परिणाम होत असतो. हिंदी महासागराच्या पश्चिमेकडील पृष्ठभाग अधिक तापल्यास 'इंडियन ओशिएन डायपोल' नावाचा घटक तयार होतो आणि तो मान्सूनला पूरक असतो, असे मानले जाते. यंदा हा घटकही सक्रिय असण्याची शक्यता असल्याने थोडीफार आशादायक स्थिती आहे; परंतु प्रतिकूलतेची शक्यता गृहीत धरून, येणाऱ्या कठीण परिस्थितीवर मात करण्यासाठी पावले उचलायला हवीत.

पान १ वरून

## भत्ते रखडल्याने चालक-वाहक...

**गणवेश धुलाई भत्ता फक्त शंभर रुपये**

एसटी कर्मचाऱ्यांना नियमित गणवेश परिधान करणे बंधनकारक आहे. महामंडळाने १ जूनपासून स्वच्छ बस आणि स्वच्छ गणेवेशातील चालक-वाहक प्रवाशांच्या सेवेसाठी असतील अशी घोषणा केली आहे. मात्र चालक वाहकांना गणवेश धुण्यासाठी दरमहा फक्त शंभर रुपये दिले जातात. एकदा धुणे व इस्त्री करण्यासाठी ८० रुपये घेतले जातात. यामुळे हा भत्ता अपुरा आहे.

**शिलाई भत्ताही थकीत**

कर्तव्यावर असताना कर्मचाऱ्यांना परिधान कराव्या लागणाऱ्या गणवेशासाठी महामंडळाकडून दर दोन वर्षाला दोन ड्रेसचे कापड व प्रत्येक ड्रेससाठी ७५० रुपये शिलाई भत्ता देण्यात येतो. यामध्ये खूपच अनियमिता असून कधी चार-चार वर्षे कपडे व भत्ता येत नाही. दोन वर्षे उलटून जाऊनही कर्मचाऱ्यांना शिलाई भत्ता मिळालेला नाही.

# पळपुट्या बाजीरावांच्या अकलेचे पानिपत



ज्ञानेश महाराव
(ज्येष्ठ पत्रकार)

**पश्चिम बंगाल, आसाम निवडणुका जिंकणाऱ्या आणि तामिळनाडू, केरळ, पुद्देचेरी राज्यात नावापुरते दिवे लावणाऱ्या 'भाजप'ने 'प्रादेशिक पक्षांचे पानिपत' केलेय का?**

'भाजप"ने पश्चिम बंगाल राज्याच्या ताज्या विधानसभा निवडणुकीत २९४ पैकी २०६ जागा जिंकून स्पष्ट बहुमतापुढे मोठी झेप घेतली. आसाममध्येही १२६ पैकी ८२ जागा मिळवून "भाजप"ने सलग तिसऱ्यांदा सत्ता मिळवली. ईशान्य भारतात असे स्पष्ट बहुमताची सत्ता मिळवणाऱ्या केंद्रीय सत्ताधारी "भाजप"ला दक्षिण भारतातील तामिळनाडू, केरळ आणि पुद्देचेरी (पाँडिचेरी) राज्यात मात्र प्रादेशिक पक्षांशी युती-आघाड्या करून फारसे यश मिळाले नाही. "भाजप"ने केंद्रीय सत्तेसाठी २०२४ मध्ये पुनर्जीवित केलेल्या "राष्ट्रीय लोकशाही आघाडी"तील (NDA) घटक पक्ष "अण्णा द्रमुक"शी तामिळनाडूत युती केली होती. तिथे "भाजप" चारवरून एका आमदारावर आला. पुद्देचेरीमध्ये एन. रंगास्वामी यांच्या नेतृत्वाखालील "ऑल इंडिया एन.आर. काँग्रेस" (AINRC), 'अण्णा द्रमुक' आणि 'भाजप' अशी आघाडी होती. ह्या आघाडीने ३० पैकी १६ जागा मिळवून सत्ता मिळवली. पण त्यात "भाजप"ची ६ वरून ४ आमदारांवर घसरण झाली. अण्णा द्रमुकचा "शून्य" स्कोअर झाला. ह्या तुलनेत केरळात "भाजप"ची कामगिरी उत्तम झाली. तिथे "काँग्रेस"च्या नेतृत्वाखालील "संयुक्त लोकशाही आघाडी"(UDF) आणि "मार्क्सवादी कम्युनिस्ट" पक्षाच्या नेतृत्वाखालील डावी आघाडी (LDF) आमने- सामने होती. ह्या दोन्हीत सामील होण्याची शक्यता नसल्याने "भाजप"ने आपली तिसरी आघाडी बनवली. त्यात "ट्वेंटी 20 पार्टी" ( ह्या पक्षाचे प्रमुख, साबू एम. जेकब हे ख्रिस्ती आहेत. ते "किटेक्स ग्रुप"चे व्यवस्थापकीय संचालक आहेत. हा पक्ष मुख्यत्वे एनार्कुलम जिल्ह्यातील किझाक्कंबलम मतदारसंघात सक्रिय आहे. कॉर्पोरेट कंपन्यांच्या सामाजिक जबाबदारीतून (CSR) त्याची निर्मिती झाली आहे.) आणि "भारत धर्म जनसेना" ( तुषार वेल्लापल्ली हे या पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष आहेत.) ह्या पक्षांबरोबर 'भाजप'ने आघाडी बनवली. त्या जोरावर केरळात "भाजप"चे ३ आमदार निवडून आले. हे यश सत्तेच्या पलीकडचे आहे.

याउलट, केरळात "काँग्रेस आघाडी"ला आणि तामिळनाडूत अभिनेता विजय थालपती यांच्या "तमिलगा वेत्री कळघम"ला (टीव्हीके) जे यश मिळालंय, ते लंगडं आहे. केरळात "काँग्रेस" नाही, तर "काँग्रेस" प्रमुख पक्ष असलेली "संयुक्त लोकशाही आघाडी"ने (UDF) १४० पैकी १०२ जागा जिंकल्यात. त्यात "काँगेस"च्या ६३ जागा आहेत. विशेष म्हणजे, ह्या आघाडीतील "इंडियन युनियन मुस्लिम लीग" (IUML) ह्या पक्षाने २७ जागा लढवून, त्यापैकी २२ जिंकल्यात. ह्याचा अर्थ, "काँग्रेस"ला स्पष्ट बहुमताचा ७० हा आकडा गाठता आला नाही. तसेच, "काँग्रेस"ने IUMLला सोबत घेतलं नसतं, तर "काँग्रेस"च्या जागा ६३ च्या खाली नक्कीच घसरल्या असत्या, हेही स्पष्ट होते.

तामिळनाडूत "द्रमुक-काँग्रेस" आणि "अण्णा द्रमुक-भाजप" अशा युत्या होत्या. पण विजय थालपतीच्या "टीव्हीके"च्या सैराट यशापुढे दोन्ही युत्या गाजराच्या पुंग्या ठरल्या. त्यात "भाजप"ची जशी ४ वरून १ आमदारावर घसरण झाली ; तशी "काँग्रेस"ही १८ वरून ५ वर आदळली. "टीव्हीके"ने तामिळनाडू विधानसभेच्या २३४ पैकी १०७ जागा जिंकल्या. पण स्पष्ट बहुमतासाठी १० जागा कमी पडल्या. ही कमतरता भरून काढण्यासाठी "टीव्हीके"ला सत्ता आधाराच्या कुबड्या सांभाळव्या लागतील.

स्वातंत्र्यानंतर भाषावार प्रांत रचना सूत्रानुसार, १९५२ मध्ये तामिळनाडू राज्य निर्माण झाले. त्यानंतरच्या तिथल्या १९५२,१९५७, १९६२ ह्या निवडणुका "काँग्रेस"ने जिंकल्या होत्या. त्यानंतर तिथे "स्वतंत्र द्रविडस्थान"च्या मुद्द्यावर चित्रपटकार सी. एन. अण्णा दुराई यांच्या नेतृत्वाखाली "द्रविड मुन्नेत्र कळघम" (DMK= द्रमुक) ह्या पक्षाची निर्मिती झाली. १९६७ च्या विधानसभा निवडणुकीत "द्रमुक"ने "काँग्रेस"चा पराभव केला आणि तामिळनाडूची सत्ता प्रादेशिक पक्षाच्या ताब्यात गेली. अण्णा दुराई मुख्यमंत्री झाले. ते मुख्यमंत्री असतानाच त्यांचे निधन (३ फेब्रुवारी १९६९) झाले. त्यांची जागा मथुवेल (एम.) करुणानिधी यांनी घेतली. करुणानिधी हेही चित्रपट लेखक होते. त्यांनी १९७२ च्या विधानसभा निवडणुकीत "द्रमुक"ला जिंकून दिलं. पण ह्याच काळात एक "ट्विस्ट" आला. चित्रपट अभिनेते मरुथुर गोपालन तथा एम.जी. रामचंद्रन (MGR) हे पक्षाचे कोषाध्यक्ष होते. ह्या पदाच्या अधिकारात त्यांनी पक्षाच्या हिशोबाची मागणी केली. यामुळे एम. करुणानिधी यांनी त्यांना पक्षातून बाहेर काढले. ह्या अपमानाचा बदला म्हणून MGR यांनी "अण्णा द्रविड मुनेत्र कळघम" (ADMK) हा वेगळा पक्ष स्थापन केला. तो "अखिल भारतीय" होताना AIADMK झाला. ही फूट होण्यापूर्वी "काँग्रेस" तामिळनाडूत मोठ्या विरोधी पक्षाच्या भूमिकेत होता. ह्या फुटीनंतर "काँग्रेस" पक्ष आक्रसू लागला. ३१ जानेवारी १९७६ पर्यंत करुणानिधी तामिळनाडूचे मुख्यमंत्री होते. १९७७ च्या विधानसभा निवडणुकीत टक्र्र यांच्या अक्अउ्टड पक्षाची सरशी झाल्याने ते मुख्यमंत्री झाले. त्यांनी पुढचीही विधानसभा निवडणूक जिंकली. त्यांचे २४ डिसेंबर १९८७ रोजी निधन झाले. त्यांच्या जागी पत्नी व्ही.एन. जानकी या मुख्यमंत्री झाल्या. पण पक्षात फूट पडल्याने त्या फक्त २४ तासच मुख्यमंत्री पदावर राहिल्या. त्यानंतर तामिळनाडूत वर्षभर राष्ट्रपती राजवट होती. त्यानंतर झालेल्या सत्तेच्या फेरमांडणीत

"द्रमुक"चे एम. करुणानिधी पुन्हा तामिळनाडूचे मुख्यमंत्री झाले. तेव्हापासून(१९९१) ते २०११ पर्यंत करुणानिधी (DMK) आणि जयललिता (AIADMK) यांच्यात सत्तापालट होत राहिला. १९९१ मध्ये MGR यांच्या लाडक्या अभिनेत्री जयललिता ह्या त्यांच्या राजकीय वारस म्हणून पुढे आल्या. त्यांच्या नेतृत्वाखाली "अण्णा द्रमुक" पक्षाला मोठा विजय मिळाला. जयललिता मुख्यमंत्री झाल्या. १९९६ मध्ये "द्रमुक"चे पुनरागमन झालं. करुणानिधी मुख्यमंत्री झाले.

२००१ ची विधानसभा निवडणूक जयललिता यांच्या पक्षाने जिंकली. जयललिता पुन्हा मुख्यमंत्री झाल्या. पण सहा महिन्यांत त्यांना विधानसभा सदस्य नसल्याने पद सोडावं लागलं. त्या तीन महिन्यांनी पोटनिवडणुकीतून तिसऱ्यांदा मुख्यमंत्री झाल्या. २००६ च्या विधानसभा निवडणुकीत पुन्हा "द्रमुक"ची सत्ता आली आणि ८० वर्षांचे करुणानिधी पुन्हा मुख्यमंत्री झाले. २०११ आणि २०१६ या विधानसभा निवडणुका "अण्णा द्रमुक"ने जिंकल्या. मात्र, ह्या काळात जयललितांना मुख्यमंत्री पद लाभले नाही. २०११ ते २०१४ ह्या काळात मुख्यमंत्री पदावर असताना अतिरिक्त संपत्तीच्या प्रकरणात दोषी ठरल्याने त्यांची तुरुंगात रवानगी झाली. त्या प्रकरणातून सुटल्यावर मे २०१५ मध्ये जयललिता पाचव्यांदा तामिळनाडूच्या मुख्यमंत्री झाल्या. त्यानंतर वर्षाने झालेल्या २०१६ च्या विधानसभा निवडणुकीत "अण्णा द्रमुक"ला विजयी करून त्या सहाव्यांदा मुख्यमंत्री झाल्या. परंतु, सहा महिन्यांत त्यांचे निधन (५ डिसेंबर २०१६) झाले.

जयललिता यांचा उत्तराधिकारी म्हणून ओ. पनीरसेल्वम यांनी मुख्यमंत्री-पदाची जबाबदारी सांभाळली. पण लवकरच "अण्णा द्रमुक" पक्षातून ई. पलानीस्वामी यांची मुख्यमंत्री म्हणून निवड करण्यात आली. त्यांना २०२१ आली नाही. आताची २०२६ ची विधानसभा निवडणूकही "अण्णा द्रमुक"ला जिंकता आली नाही. दरम्यान, एम. करुणानिधी यांचे ७ ऑगस्ट २०१८ रोजी वयाच्या ९४ व्या वर्षी निधन झाले. त्यांचा मुलगा एम. के. स्टॅलिन करुणानिधींचे मदतनीस म्हणून राजकारणात होतेच. त्यांच्या हाती "द्रमुक"ची सूत्रे आधीपासून असल्याने त्यांनी २०२१ ची निवडणूक जिंकली आणि मुख्यमंत्री झाले. अनेक प्रश्नांवर ते "मोदी सरकार"ला भिडले. त्यामुळेच "काँग्रेस"ने विधानसभा निवडणुकीत "टीव्हीके"ने ७५ जागा देऊन युतीची ऑफर केली असतानाही "द्रमुक"शी युती केली. तथापि, १९६७ पासून तमिळनाडूच्या सत्तापटावर "द्रमुक' आणि 'अण्णा द्रमुक"मधला तब्बल ६० वर्षे सुरू राहिलेला "खो खो"चा खेळ विजय थालपतीच्या "टीव्हीके"ने यावेळी संपवला. मात्र त्याने तामिळनाडूचे अस्मितेचे राजकारण संपलेले नाही. "दोन्ही द्रमुक हे 'टीव्हीके'चे राजकीय शत्रू आहेत आणि 'भाजप' आमचा वैचारिक शत्रू आहे," असे म्हणत विजय थालपतींनी जयललिता आणि करुणानिधींच्या मृत्यूनंतर तमिळनाडूच्या राजकारणात थांबलेला सिनेमा पुन्हा सुरू केला आहे.

यावेळच्या पाच विधानसभा निवडणुकीच्या निकालांची बातमी देताना "गोदी मीडिया"ने "प्रादेशिक पक्षांचे पानिपत" आणि केरळच्या निकालावर "कम्युनिस्टांचा शेवटचा गड कोसळला" अशा शीर्षकाच्या बातम्या दिल्यात. त्या वस्तुस्थितीतीला धरून नाहीत. तामिळनाडूचा तपशील वरती दिला आहे. तिथे प्रादेशिक पक्ष संपण्याऐवजी "टीव्हीके" हा नवा प्रादेशिक पक्ष उदयाला आला आहे. "द्रमुक" (६०) आणि "अण्णा द्रमुक" (४७) यांचे मिळून १०७ आमदार आहेत. त्यांच्या जोडीला "टीव्हीके"चे १०८ आमदार धरल्यास "प्रादेशिक अस्मिता" पंक्चर होते की दुप्पट होते?

"तृणमूल काँगेस" हा पश्चिम बंगालमधला प्रादेशिक पक्ष. ह्या पक्षाने १९७७ ते २०११ अशी सलग ३४ वर्षे राज्य करणाऱ्या "कम्युनिस्ट-डाव्या आघाडी"ला २०११ च्या निवडणुकीत भुईसपाट केलं. त्यामुळे "भाजप"ला २०२१च्या निवडणुकीत ७७ आमदारांपर्यंत मजल मारता आली. तेव्हाही "भाजप"ने केंद्र सरकारच्या यंत्रणा वापरल्या होत्या. त्यात आता पुढचं पाऊल टाकून "निवडणूक आयोग"ही वापरला. तरीही २०६ जागा जिंकणाऱ्या "भाजप"ला, "तृणमूल काँग्रेस"चा २०२१ चा २१५ हा आकडा गाठता आला नाही; आणि आता ८१ जागा मिळवणाऱ्या "तृणमूल"ला 'भाजप'च्या २०२१ च्या ७७ आकड्यापर्यंत उतरवता आले नाही. तरीही, 'पानिपत' झाले म्हणायचे का?

आसामात "भाजप"ला तिसऱ्यांदा सत्ता मिळालीय. १२६ जागांच्या विधानसभा निवडणुकीत २०२१ मध्ये "भाजप"ला ६० जागा मिळाल्या होत्या. यावेळी स्पष्ट बहुमत पार करीत त्या ८२ झाल्यात. तेथे "काँग्रेस" २९ वरून १९ वर घसरली तरी; प्रादेशिक पक्ष असलेल्या "आसाम गण परिषद"च्या जागा ९ च्या १० जागा झाल्यात; तर "बोडो फ्रंट"ने १० जागा जिंकून आपलं खातं उघडलंय. ह्यात कुठल्याही प्रादेशिक पक्षाचं पानिपत झालेलं नाही. पुद्देचेरी ह्या छोट्या राज्यात केंद्र सत्ताधारी असलेला "भाजप" 'काँग्रेस'चं शेपूट असलेल्या एन. रंगास्वामी यांच्या AINRC पक्षाच्या मदतीने सत्ता लाभ चाखतोय. ह्याला काय म्हणायचं?

पश्चिम बंगाल, केरळ, त्रिपुरा ह्या राज्यात दीर्घकाळ कम्युनिस्टांच्या डाव्या आघाडीची सत्ता होती. ह्या बळावर २००४ च्या लोकसभा निवडणुकीत त्यांचे ५९ खासदार निवडून आले आणि त्यांच्या पाठिंब्यावर "काँग्रेस"ने यूपीए-१ सरकार बनवले. मनमोहन सिंह प्रधानमंत्री झाले. ह्याच काळात (२००८) डाव्यांचे "काँग्रेस"शी भारत-अमेरिका अणुकरार (न्युक्लिअर डील) मुद्यावर बिनसले. या करारामुळे भारत अमेरिकेच्या जवळ जात आहे; त्यामुळे भारताचे सार्वभौमत्व कमी होईल; परराष्ट्र धोरण बिघडेल; असे डाव्यांचे म्हणणे होते. ह्या मुद्द्यावर त्यांनी "मनमोहन सिंह सरकार"चा पाठिंबाही काढून घेतला. (परंतु, मुलायम सिंह यांच्या 'समाजवादी पक्षा'च्या पाठिंब्याच्या जोरावर "यूपीए - १" सरकार सलामत राहिले.) ह्या धरसोडपणामुळे २००९, २०१४, २०१९ च्या निवडणुकांत कम्युनिस्ट खासदारांची संख्या २४,१०,५ अशी रोडावत; २०२४ च्या निवडणुकीत ती ४ झालीय. त्याचे परिणाम केरळच्या विधानसभा निवडणुकीवर होणार, हे अटळ होते. तसेच, ते अपेक्षितही होते.

१९५७ मध्ये केरळ राज्याची स्थापना झाली. त्यावेळी झालेल्या राज्य विधानसभा निवडणुकीत कम्युनिस्ट विजयी झाले आणि ई. एस. नंबुद्रीपाद मुख्यमंत्री झाले. हे लोकशाही मार्गाने सत्तेवर आलेले जगातील पहिले "कम्युनिस्टांचे सरकार" होते. तेव्हापासून केरळात आलटून-पालटून मार्क्सवादी कम्युनिस्ट - डाव्या आघाडीची (LDF) किंवा "काँग्रेस" नेतृत्वाखालील मध्यम-उजव्या राजकीय आघाडीची सत्ता येते. नमुन्यादाखल गेल्या ४० वर्षांचा तपशील असा आहे. कम्युनिस्ट आघाडी (LDF) चे सरकार - १९८७, १९९६, २००६, २०१६, २०२१. काँग्रेस आघाडी (UDF) चे सरकार - १९९१, २००१, २०११, २०२६.

दर पाच वर्षांनी सरकार बदलण्याचा हा कल पाहता २०२१ मध्ये केरळात "काँग्रेस"च्या (UDF) आघाडीचे सरकार आले पाहिजे होते. तथापि, LDF चे मुख्यमंत्री पिनाराई विजयन यांनी ओखा चक्री वादळ, विध्वंसकारी पूर, कोरोना- लॉकडाउन ह्या आपत्तीत लोकांना दिलासा मिळेल,असे काम केल्याने डाव्या आघाडीने २०१६ नंतर २०२१ ची विधानसभा निवडणूकही जिंकली आणि सलग १० वर्षे पहिल्यांदाच सत्ता राखली. यावेळी केरळात "काँग्रेस" २२ वरून ६३ जागांवर आली आणि "मार्क्सवादी कम्युनिस्ट" ६२ वरून २६ वर गडगडले. पश्चिम बंगालमध्ये ३४ वर्षे सत्ता राबवणारे कम्युनिस्ट २०११ मध्ये सत्तेवरून कोसळले, ते पुन्हा उठले नाही. ताज्या निवडणुकीत 'मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षा'चा फक्त १ आमदार विजयी झाला. ही "तृणमूल काँग्रेस"ची कमाल! (२०११ मध्ये विजयाच्या उन्मादात "तृणमूल"च्या कार्यकर्त्यांनी कम्युनिस्टांच्या कार्यालयांवर हिंसक हल्ले करून जाळपोळ केली. त्याच्या वरचढ ऊतमात यावेळी "भाजप" कार्यकर्त्यांनी दाखवलाय. त्यांनी "तृणमूल"च्या कार्यालयांची मोडतोड केलीच. पण त्याचबरोबर मुर्शिदाबाद शहरातल्या चौकातला लेनिनचा पुतळाही जमीनदोस्त केला.)

त्रिपुरातही २०१८ च्या निवडणुकीत "भाजप"ची सत्ता आल्यावर हरलेले कम्युनिस्ट २०२३ च्या निवडणुकीत आणखी खचले; आणि १६ वरून ११ जागांवर आले. असेच केरळमध्ये घडेल, असे नाही. कारण, तिथे विजयाचा उन्माद दाखवणारे सत्तेवर आलेले नाहीत. तिथे जाती-धर्मावरील आधारित समीकरणे आणि सोशल इंजिनियरिंग, विकास कामांची संथ गती यामुळे सत्तापालट झाला आहे. त्यात कुठल्याही एका पक्षाचा विजय झालेला नाही. तो दोन प्रबळ राजकीय आघाड्यामधील मतदारांचा कौल आहे. तो नीटपणे समजून घेण्याऐवजी "गोदी मीडिया"वाले "प्रादेशिक पक्षांचे पानिपत झाले', 'शेवटचा गड पडला," असे म्हणत असतील तर, त्यांना "पत्रकारितेतले पळपुटे बाजीराव" हा किताब दिला पाहिजे.

**केरळ राज्यात सर्वपक्षीय सत्ता**

महाराष्ट्रात सध्या महायुतीची सत्ता आहे. त्यात "शिवसेना" आणि "राष्ट्रवादी काँग्रेस" हे पक्ष आहेत. तसेच, ते फुटीमुळे विरोधी पक्षांच्या महविकास आघाडीतही आहेत. ह्यापेक्षा व्यापक चित्र केरळात आहे. तिथे "भाजप" वगळता उर्वरित पक्ष; "काँग्रेस"च्या नेतृत्वाखालील "युनायटेड डेमॉक्रॅटिक फ्रंट" (UDF = संयुक्त लोकशाही आघाडी) किंवा "भारतीय कम्युनिस्ट पक्ष" (मार्क्सवादी= CPI-M) च्या नेतृत्वाखालील "लेफ्टिस्ट डेमॉक्रॅटिक फ्रंट" (LDF = लोकशाही आघाडी) ह्या दोन आघाड्यांमध्ये सामावले आहेत. विशेष म्हणजे, दोन्ही आघाड्यांत अनुक्रमे विभाजन झालेले कम्युनिस्ट आणि काँग्रेस पक्ष आहेत. ते असे -

**UDF आघाडीचे घटक पक्ष**

१) भारतीय राष्ट्रीय काँग्रेस (INC) - आघाडीतील प्रमुख पक्ष.
२) इंडियन युनियन मुस्लिम लीग (IUML) - एक मजबूत सहयोगी पक्ष. ह्या पक्षाला विशेषतः उत्तर केरळमध्ये मोठा जनाधार आहे.
३) केरळ काँग्रेस (जोसेफ) - KEC (J) - पक्षप्रमुख - पी. जे. जोसेफ.
४) केरळ काँग्रेस (जेकब) - पक्षप्रमुख - अनुप जेकब.
५) नॅशनल काँग्रेस केरळ (NCK) - पक्षप्रमुख - मणी सी. कप्पन.
६) रिव्होल्युशनरी मार्कसिस्ट पार्टी ऑफ इंडिया (RMPI) - डाव्या विचारसरणीचा पक्ष.
७) रिव्होल्युशनरी सोशलिस्ट पार्टी (RSP) - डाव्या विचारसरणीचा पक्ष.

**LDF आघाडीतील घटक पक्ष**

१) भारतीय कम्युनिस्ट पक्ष - मार्क्सवादी - आघाडीतील प्रमुख पक्ष. नेतृत्व, एम. व्ही. गोविंदम.
२) भारतीय कम्युनिस्ट पक्ष (CPI) - नेतृत्व, बिनॉय विश्वम.
३) केरळ काँग्रेस (KC-M) - पक्षप्रमुख - जोस के. मणी.
४) राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष - शरदच्चंद्र पवार - केरळ राज्य नेता, थॉमस के. थॉमस.
५) केरळ काँग्रेस (बी) - पक्षप्रमुख, के. बी. गणेश कुमार.
६) जनाधिपथ्य केरळ काँग्रेस
७) राष्ट्रीय जनता दल (RJD) - केरळ राज्य नेता, एम.व्ही. श्रेयम्स कुमार.
८) इंडियन नॅशनल लीग (INL) - पक्षप्रमुख, अहमद देवरकोविल.
९) क्रांतिकारी समाजवादी पक्ष (लेनिनवादी)

# मुख्य रस्ता रोखला, ग्रामपंचायतीची लाईन फोडली; केम ग्रामस्थांचा गाव बंदचा इशारा

**करमाळा (कटूसत्य वृत्त):-** करमाळा तालुक्यातील केम गावात सार्वजनिक रस्ता बंद करणे आणि ग्रामपंचायतीची पाणीपुरवठा लाईन फोडण्याच्या प्रकारामुळे ग्रामस्थांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे. प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून कारवाई न केल्यास संपूर्ण केम गाव बंद ठेवून तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

केम येथील केम-टेंभुर्णी जिल्हा प्रमुख मार्ग तथा निवृत्ती महाराज पालखी मार्ग या सार्वजनिक रस्त्यावर मोठमोठे दगड टाकून वाहतूक बंद करण्यात आल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. हा रस्ता अनेक वर्षांपासून सार्वजनिक वापरासाठी सुरू असून सध्या लुअट अंतर्गत रस्त्याचे काम सुरू असताना भरत महादेव तळेकर यांनी मागील महिनाभरापासून या मार्गावर दगड टाकून वाहतूक ठप्प केल्याचे सांगण्यात आले.

या प्रकारामुळे एसटी बससेवा पूर्णपणे बंद झाली असून सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, व्यापारी तसेच शालेय विद्यार्थी-विद्यार्थिनींना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. पर्यायी मार्ग नसल्याने ग्रामस्थांचे दैनंदिन जीवन विस्कळीत झाले असून प्रशासनाविरोधात नाराजी वाढत आहे.

याचबरोबर, १४ मे २०२६ रोजी रात्री केम गावाला पाणीपुरवठा करणारी ग्रामपंचायतीची मुख्य पाईपलाईन फोडण्यात आल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. या घटनेमुळे ग्रामपंचायतीचे आर्थिक नुकसान झाले असून संपूर्ण गावात पाणीटंचाईची समस्या निर्माण झाली आहे. नागरिकांना पाण्यासाठी मोठी गैरसोय सहन करावी लागत आहे.

या दोन्ही घटनांची गंभीर दखल घेऊन संबंधितांवर तात्काळ फौजदारी गुन्हे दाखल करावेत, बंद करण्यात आलेला सार्वजनिक रस्ता त्वरित मोकळा करून द्यावा तसेच ग्रामपंचायतीची पाणीपुरवठा व्यवस्था पूर्ववत करावी, अशी मागणी ग्रामस्थांनी प्रशासनाकडे केली आहे.

तहसील प्रशासन, पोलीस प्रशासन, महसूल विभाग, भूमि अभिलेख विभाग, केम ग्रामपंचायत आणि पंचायत समिती करमाळा यांनी संयुक्तपणे हस्तक्षेप करून हा प्रश्न तातडीने सोडवावा, अन्यथा संपूर्ण केम गाव एक दिवस बंद ठेवण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे.

तसेच, प्रशासनाने तातडीने निर्णय न घेतल्यास ग्रामस्थ, सरपंच, उपसरपंच आणि ग्रामपंचायत सदस्य यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकारी कार्यालय येथे मोठ्या प्रमाणावर आंदोलन करण्यात येणार असल्याचेही सांगण्यात आले आहे.



## वात्रटिका

### शिक्षा कोणाला...

कोणी टर्न घ्या अगर
आता कोणी घ्या युटर्न...
बुंद से गई हौदसे नही आती
बदनाम झाला पॅटर्न...
फुटलेला पेपर नेमका
पैसेवाल्यांच्याच हाती आला...
आशा धरून खर्च केला बापानं
पोरगा अभ्यास करून मेला...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
**8698067566**

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# नीरा नरसिंहपूर येथे श्री स्वामी समर्थ सेवेकऱ्यांकडून नदी स्वच्छता मोहीम

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** नदी स्वच्छता व जल संवर्धन अभियान २०२६ अंतर्गत नदी हीच माता,तीच आपली जीवनदाता ! आहे त्यामुळे अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ सेवा व आध्यात्मिक विकास मार्ग (दिंडोरी प्रणित) श्री स्वामी समर्थ केंद्र अकलूज व माळीनगर (जि.सोलापूर) यांच्या वतीने पर्यावरण प्रकृती विभागाच्या वतीने गंगा दशहरा सप्ताह निमित्त नीरा नरसिंहपूर येथील संगमावरील नीरा–भीमा नदी किनारी स्वच्छता अभियान राबविण्यात आले होते.



यावेळी केंद्रातील सेवेकरी परिवारातील महिला व पुरुष सेवेकऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत नदी परिसराची स्वच्छता केली. नदी प्रदूषणमुक्त ठेवण्यासाठी लोकांमध्ये जनजागृती करण्यात आली.

**'स्वच्छ नदी – निरोगी पर्यावरण'** हा संदेश देण्यात आला. उपस्थितांना नदीचे पावित्र्य जपण्याची,प्लास्टिक व कचरा नदीत न टाकण्याची आणि नदी संवर्धनासाठी सतत प्रयत्न करण्याची प्रतिज्ञा घेतली.या कार्यक्रमा दरम्यान नदी पूजन करून नदीचा मानसन्मान सेवा रुजू करण्यात आली.पर्यावरण संवर्धन आणि समाजप्रबोधनाच्या दृष्टीने हा उपक्रम प्रेरणादायी ठरला.

या अभियाना अंतर्गत नदी परिसरातील प्रदूषण कमी करण्यासाठी श्रमदान करण्यात आले.तसेच नीरा–भीमा नदीची पूजा देखील करण्यात आली.नदी स्वच्छतेच्या या पवित्र कार्यानंतर देवस्थानच्या मंदिरामध्ये सर्व सेवेकऱ्यांनी एकत्र येऊन अत्यंत भक्तीभावाने 'संक्षिप्त भागवत पाठ' केला.या स्तुत्य उपक्रमाची दखल घेऊन श्री लक्ष्मी–नृसिंह देवस्थानच्या वतीने उपस्थित सर्व सेवेकऱ्यांसाठी महाप्रसादाची (भोजनाची) उत्तम व्यवस्था करण्यात आली होती.

# 'पर्यावरण संवर्धन ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी': अरुण कृष्णमूर्ती





**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** आजच्या पर्यावरणीय आव्हानांच्या पार्श्वभूमीवर युवकांमध्ये पर्यावरणाबद्दल संवेदनशीलता, शाश्वत विकासाची जाणीव आणि सामाजिक जबाबदारीची भावना निर्माण करण्याच्या उद्देशाने एमआयटी एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठाच्यावतीने प्रख्यात पर्यावरणवादी कार्यकर्ते अरुण कृष्णमूर्ती यांच्याशी विशेष संवाद व चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. देशभरातील तलाव, नद्या आणि विविध जलस्रोतांचे पुनरुज्जीवन, जैवविविधतेचे संरक्षण आणि पर्यावरण संवर्धनासाठी उल्लेखनीय कार्य करणाऱ्या एन्व्हार्नमेंटलिस्ट फाउंडेशन ऑफ इंडिया (Environmentalist Foundation of India - EFI) चे संस्थापक अरुण कृष्णमूर्ती यांनी आपल्या प्रभावी संवादातून युवकांमध्ये पर्यावरणीय जबाबदारीची जाणीव जागृत केली. पर्यावरणीय संकटांची गंभीरता अधोरेखित करत त्यांनी शाश्वत जीवनशैलीचा स्वीकार, नैसर्गिक साधन संपत्तीचे जतन आणि सामूहिक कृतीचे महत्त्व विशद करताना पर्यावरण संवर्धनासाठी केवळ जागरूक न राहता प्रत्यक्ष कृतीशील होण्याचा संदेश दिला.

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या उपस्थितीत विश्वशांती प्रार्थनेने झाली. त्यानंतर अरुण कृष्णमूर्ती यांच्या पर्यावरणीय कार्यप्रवासावर आधारित माहितीपट सादर करण्यात आला. तलाव पुनरुज्जीवन मोहिमा, समुदाय सहभाग, पर्यावरण संवर्धनासाठी केलेले नावीन्यपूर्ण प्रयत्न आणि त्यांच्या उपक्रमांचा समाजावर झालेला सकारात्मक परिणाम यांचे प्रभावी दर्शन यामधून घडविण्यात आले. यावेळी बोलताना त्यांनी, 'पर्यावरण संवर्धन ही केवळ सरकार किंवा संस्थांची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे.' असे विचार मांडले. युवक हे अशा सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी वाहक ठरू शकतात, असा विश्वास व्यक्त करत त्यांनी विद्यार्थ्यांना पर्यावरण रक्षणासाठी सक्रिय योगदान देण्याचे आवाहन केले.

यानंतर आयोजित संवाद सत्रात प्रा. अमिताभा घोष यांनी पर्यावरण संवर्धन, नेतृत्व व समुदाय सहभाग, जलस्रोत पुनरुज्जीवन आणि शाश्वत विकास यांसंदर्भात विविध प्रश्न उपस्थित केले. विद्यार्थ्यांच्या वतीनेही उत्स्फूर्त प्रश्न विचारण्यात आले. या प्रश्नांना उत्तर देताना अरुण कृष्णमूर्ती यांनी देशाच्या विविध भागांत काम करताना आलेली अनुभव, आव्हाने आणि यशस्वी पर्यावरणीय उपक्रमांची उदाहरणे मांडली. पर्यावरण संवर्धनाच्या मोहिमेत प्रत्येक व्यक्तीने छोट्या कृतींमधूनही मोठा बदल घडवू शकतो, हा आशावादी संदेश त्यांनी दिला.

समारोपप्रसंगी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. गोपालकृष्ण जोशी यांनी सामाजिकदृष्ट्या जबाबदार व संवेदनशील नेतृत्व घडविण्यासाठी अशा संवादमाला आणि उपक्रमांची आवश्यकता व्यक्त केली. पुढे बोलताना ते म्हणाले 'एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठ हे आजच्या तरुण पिढीला पर्यावरणीय जबाबदारी आणि शाश्वत विकासाच्या दिशेने जागरूक करण्यासाठी सातत्याने विविध उपक्रम राबवित आहे. यासाठी पर्यावरण संवर्धनासाठी प्रत्यक्षात काम करणारे अरुण कृष्णमूर्ती सारखे आदर्श व्यक्तिमत्व विद्यार्थ्यांना कृतीशील आणि पर्यावरण संरक्षणाच्या मोहिमेत सक्रिय होण्यासाठी नक्कीच प्रेरित करतील.' असा विश्वास व्यक्त केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. राहुल दमजी आणि गायत्री गायकवाड यांनी केले. या चर्चासत्रास विद्यार्थी, प्राध्यापक आणि विशेष निमंत्रितांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

# विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांचा स्फोट; महाराष्ट्र सर्वांत पुढे



**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** देशाच्या भविष्यासाठी घडणारी तरुण पिढीच आता गंभीर मानसिक संकटाच्या विळख्यात अडकत असल्याचे धक्कादायक चित्र समोर आले आहे. राष्ट्रीय गुन्हे नोंद ब्युरो (ठउफइ) च्या ताज्या आकडेवारीनुसार, २०२४ या वर्षात देशभरात तब्बल १४ हजार ४८८ विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्याची नोंद झाली आहे. म्हणजेच देशात दररोज सरासरी ४० विद्यार्थी स्वतःचे जीवन संपवत असल्याची भीषण वास्तवता समोर आली आहे.

शिक्षण, स्पर्धा, गुणांची शर्यत, पालकांच्या अपेक्षा आणि करिअरचा वाढता दबाव यामुळे विद्यार्थ्यांवरील मानसिक ताण असह्य होत असल्याचे या आकडेवारीतून स्पष्ट होत आहे. शिक्षण क्षेत्र आणि समाजासाठी ही एक गंभीर धोक्याची घंटा मानली जात आहे.

एनसीआरबीच्या आकडेवारीनुसार, १८ वर्षांखालील विद्यार्थ्यांमध्ये परीक्षेत अपयश हे आत्महत्येमागील प्रमुख कारण ठरत असल्याचे समोर आले आहे. २०२४ मध्ये १ हजार ७१ विद्यार्थ्यांनी केवळ परीक्षेत अपयश आल्यामुळे आत्महत्या केल्याची नोंद झाली आहे. यामुळे गुण आणि यशाच्या मोजपट्टीवर विद्यार्थ्यांचे आयुष्य तोलण्याच्या मानसिकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

तज्ज्ञांच्या मते, विद्यार्थ्यांवर वाढणारा अभ्यासाचा ताण, सोशल मीडियामुळे निर्माण होणारी तुलना, स्पर्धात्मक वातावरण, करिअरबाबतची अनिश्चितता आणि पालकांच्या वाढत्या अपेक्षा यामुळे मानसिक तणाव वाढत आहे. अनेक विद्यार्थी नैराश्य, चिंता आणि एकटेपणाचा सामना करत असताना त्यांना योग्य वेळी मानसिक आधार मिळत नसल्याचेही दिसून येत आहे.

विशेष म्हणजे, विद्यार्थ्यांच्या आत्महत्येच्या घटनांमध्ये महाराष्ट्र राज्य देशात आघाडीवर असल्याचेही आकडेवारीतून समोर आले आहे. ही बाब अधिक चिंताजनक मानली जात असून, शिक्षण पद्धतीबरोबरच मानसिक आरोग्य व्यवस्थेचा गंभीर पुनर्विचार करण्याची गरज व्यक्त होत आहे.

शिक्षण म्हणजे केवळ गुणांची स्पर्धा नसून विद्यार्थ्यांचे मानसिक आरोग्य आणि भावनिक स्थैर्यही तेवढेच महत्त्वाचे असल्याची भावना आता अधिक ठळकपणे पुढे येत आहे. अन्यथा भविष्यात ही परिस्थिती आणखी गंभीर होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

# जनगणना २०२७ अंतर्गत घरगणना कामाचा वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून आढावा



**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** सह संचालक, जनगणना कार्य निदेर्शालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई रमेश भोसले तसेच जिल्हा समन्वय अधिकारी अजित भांड यांनी सोलापूर महानगरपालिका येथे भेट देऊन जनगणना २०२७ अंतर्गत सुरू असलेल्या घरगणना / घरयादी कामाचा आढावा घेतला.

यावेळी अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे व सहाय्यक आयुक्त गिरीश पंडित यांच्या हस्ते रमेश भोसले व अजित भांड यांचे स्वागत करण्यात आले. त्यानंतर संबंधित अधिकाऱ्यांसमवेत जनगणना कायार्चा सविस्तर आढावा घेण्यात आला.

यानंतर माननीय सह संचालक रमेश भोसले यांनी सोलापूर महानगरपालिका हद्दीतील सर्व चार्ज क्रमांक १ ते ८ मधील प्रगणक (Enumerator) व पर्यवेक्षक (Supervisor) यांच्या कामकाजाची प्रत्यक्ष क्षेत्रीय पाहणी केली. घरगणना व घरयादी नोंदणी प्रक्रियेची माहिती घेऊन त्यांनी कामाच्या अंमलबजावणीची तपासणी केली.

पाहणीदरम्यान त्यांनी प्रगणक व पर्यवेक्षकांशी संवाद साधून जनगणना कार्य अधिक अचूक, प्रभावी व पारदर्शक पद्धतीने पार पाडण्यासाठी आवश्यक सूचना दिल्या. नागरिकांकडून माहिती संकलन करताना शासनाच्या सूचनांचे काटेकोर पालन करावे तसेच माहिती नोंदणीमध्ये कोणतीही त्रुटी राहू नये, याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

जनगणना हे देशाच्या नियोजन आणि विकासासाठी अत्यंत महत्त्वाचे कार्य असून प्रत्येक घराची अचूक माहिती संकलित होणे आवश्यक असल्याचे त्यांनी यावेळी नमूद केले. तसेच सोलापूर महानगरपालिका क्षेत्रात सुरू असलेल्या घरगणना व घरयादी कामाबाबत समाधान व्यक्त करून संबंधित अधिकारी, प्रगणक व पर्यवेक्षक यांच्या कार्याचे कौतुक केले. सदर प्रसंगी सहाय्यक कर संकलन व कर प्रमुख ओमप्रकाश वाघमारे तसेच जनगणना मुख्य कार्यालयातील संदीप भोसले व आशिष घुले उपस्थित होते.


जलसंपदा विभाग शासन निर्णय क्रमांक निवीदा ०४१७/प्र.क्र.२४७/मोप्र–१ दि.१८/१०/२०२३

**परिशिष्ट–३**

**महाराष्ट्र शासन**

**कार्यकारी अभियंता, यांत्रिकी विभाग क्र. २ पुणे ३७ यांचे कार्यालय,**

पत्ता– नविन मुठा कालव्याशेजारी, स्वारगेट, पुणे ४११०३७.

ई मेल – eemd123@gmail.com दूरध्वनी क्र :– ०२०–२४२६६०११

**ई–निविदा सूचना क्रमांक २०–०३ (Second call) सन २०२५–२६**

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता यांत्रिकी विभाग क्र. २ पुणे ३७ हे सक्षम निविदाकारांकडुन खालील कामाकरीता ई निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ https://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावीत. सविस्तर निविदा सुचना व ई–निविदाबाबत सर्व माहिती शासनाच्या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सुचना फलकावर उपलब्ध आहे.

निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता यांत्रिकी विभाग क्र. २ पुणे ३७ यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही. सदर निविदा सुचनेमध्ये कांही बदल होत असल्यास शासनाच्या https://mahatenders.gov.in संकेतस्थळावर कळविण्यात येईल.

| अ.क्र. | कामाचे नांव | जिल्हा | निविदा किंमत (वस्तु व सेवाकर वगळून) |
|---|---|---|---|
| १ | भीमा पाटबंधारे उपविभाग, करकंब अंतर्गत उजनी डावा कालवा वरील असणारे वितरिका क्र.३३ व ३४, CR,लोखंडी पुल व्दार दुरुस्ती करणे. | सोलापूर | रु.२७,६१,१४१/– |

**ई निविदा उपलब्ध कालावधी** : दि.१९/०५/२०२६ वेळ : ११.०० ते दि.२७/०५/२०२६ वेळ : १८.००

**ई निविदा उघडण्याचा दिनांक** : दिनांक– २९/०५/२०२६ वेळ १२.०० (शक्य झाल्यास)

महाराष्ट्र शासन, जलसंपदा विभाग, शासन निर्णय क्रमांक संकिर्ण/१२१७/प्र.क्र.११४/१७)/यांत्रिकी दिनांक ०५/०७/२०१८ आणि शासन परिपत्रक क्रमांक: संकीर्ण–०५२३/(प्र.क्र.२५/२०२३)/यांत्रिकी दिनांक १४/१०/२०२४. शासन निर्णय निविदा ४१७/प्र.क्र.२४७/१७ दि. १८/१०/२०२३ अन्वये करारनाम्यात अनुक्रमे पश्चात अर्हता निकष व इतर सर्व अटी लागू राहतील. खालील संकेतस्थळावर ई–निविदा बाबत सर्व माहिती उपलब्ध आहे.

जा.क्र.१२०६ दिनांक : ०८/०५/२०२६

कार्यकारी अभियंता यांत्रिकी विभाग क्र. २ पुणे. ३७

जिमाका/सो/जाहि/२९/२०२६-२७

**सही/– कार्यकारी अभियंता**
**यांत्रिकी विभाग क्र. २, पुणे– ३७**



**जाहीर प्रसिध्दीकरण** अर्ज. नं./२०२६

**मोहोळ येथील मे. तहसिलदार साहेब यांचे समोर**

मनोज शिवाजी माळी वय – १८ वर्षे, धंदा– शिक्षण, रा. कामती खुर्द, ता. मोहोळ, जि. सोलापूर. } **अर्जदार**

**विरूद्ध**

ग्रामपंचायत कामती खुर्द,ता. मोहोळ,जि. सोलापूर } **सामनेवाला**

ज्याअर्थी यातील अर्जदार यांनी त्यांचा जन्म ता. २१/०२/२००८ रोजी मौजे कामती खुर्द ता.मोहोळ येथे झालेला आहे. परंतु त्याच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत कामती खुर्द, ता.मोहोळ, जि.सोलापूर ग्रामपंचायत जन्माचे रजिस्टरला झालेली नाही. याकरीता जन्म व मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३ (३) प्रमाणे अर्ज या कोर्टात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी वर नमुद अर्जदार यांच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत कामती खुर्द यांच्या जन्माचे रजिस्टरला होण्याकरीता कोणाची कोणत्याही प्रकारची तक्रार अगर हरकत असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन १५ दिवसाच्या आत अथवा दि.०२/०६/२०२६ रोजी समक्ष अथवा वकीलामार्फत कोर्टात हजर राहुन आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाची कसलीही हरकत न आल्यास अर्जदारांना त्यांचे अर्जात मागणी प्रमाणे अर्ज मंजुर करण्यात येईल याची नोंद घ्यावी. हे प्रसिध्दीकरण आमचे सहीनिशी व शिक्क्यानीशी दिले असे ता.१८/०५/२०२६

**तहसिलदार मोहोळ**


# एमआरपीच्या नावाखाली ग्राहकांची लूट; कायद्यात दुरुस्तीची करमाळ्यातून मागणी



**करमाळा (कटूसत्य वृत्त):-** विविध प्रकारच्या वस्तूंवर छापण्यात येणाऱ्या अवाजवी अधिकतम किरकोळ विक्री मूल्य (एमआरपी) मुळे ग्राहकांची आर्थिक लूट होत असल्याचा आरोप करत अखिल भारतीय ग्राहक पंचायत, करमाळा शाखेच्या वतीने तहसीलदार शिल्पा ठोकडे यांना सविस्तर निवेदन देण्यात आले. हे निवेदन पंतप्रधान तसेच केंद्रीय ग्राहक संरक्षण मंत्र्यांपर्यंत पोहोचविण्यात येणार असून, देशभरातून अशाच स्वरूपाची निवेदने पाठविली जात आहेत.

ग्राहकांच्या हितासाठी राबविण्यात येत असलेल्या देशव्यापी आंदोलनाचा एक भाग म्हणून करमाळ्यात हा उपक्रम पार पडला. ग्राहक पंचायतने शासनाकडे मागणी केली आहे की, बाजारात विक्री होणाऱ्या सर्व प्रकारच्या वस्तूंवर केवळ एमआरपी न छापता त्या वस्तूचा उत्पादन खर्चही स्पष्टपणे नमूद करण्यात यावा. यामुळे ग्राहकांना वस्तूची खरी किंमत आणि त्यावरील नफा किती आहे, याची पारदर्शक माहिती मिळू शकेल.

यावेळी जिल्हा ग्राहक संरक्षण परिषद, जिल्हाधिकारी कार्यालय सोलापूरच्या सदस्या माधुरी परदेशी, तालुका उपाध्यक्ष चक्रधर पाटील, तालुका सचिव अजिम खान, कार्यकारिणी सदस्य भिमराव कांबळे, पत्रकार आशपाक सय्यद, तालुका सदस्य मंजिरी जोशी, निशिगंधा शेंडे व किशोरी चुंबळकर उपस्थित होते.

या वेळी बोलताना तालुका सचिव अजिम खान यांनी सांगितले की, 'ग्राहक संरक्षणासाठी असलेली एमआरपी पद्धत आता अनेक कंपन्यांच्या नफेखोरीचे साधन बनली आहे. अनेक वस्तूंचा उत्पादन खर्च अत्यल्प असतानाही त्यावर अवास्तव एमआरपी छापून ग्राहकांकडून जादा पैसे आकारले जातात. औषधे, सौंदर्य प्रसाधने, इलेक्ट्रॉनिक वस्तू, खाद्यपदार्थ तसेच इतर पॅकेजिंग वस्तूंमध्ये ग्राहकांची फसवणूक होत असून, यावर नियंत्रण ठेवण्यासाठी कायद्यात तातडीने बदल करणे आवश्यक आहे.'

ग्राहक पंचायतने दिलेल्या निवेदनात ग्राहकांच्या आर्थिक शोषणाला आळा घालण्यासाठी शासनाने कडक नियम, नियंत्रण आणि कायदेशीर निर्बंध लागू करावेत, अशी मागणी करण्यात आली आहे. देशव्यापी आंदोलनाच्या माध्यमातून ग्राहक हक्कांबाबत जनजागृती करत शासनाचे लक्ष या प्रश्नाकडे वेधण्याचा प्रयत्न केला जात आहे.


## Classified - छोटी जाहीरात

**निर्मल व्यसनमुक्ती केंद्र**

मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नंपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय **निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

–: संपर्क :–
8083608083
9922646566
8698732109

**बोअरवेल**

**सोलापूरात प्रथमच मशिनद्वारे** २ फूट व्यासाचे खोल पाण्याची विहीर खोदून मिळेल. संपर्क – शिवगंगा वॉटर वेल–सर्व्हिस रविवार पेठ, सोलापूर.
**9420766666**

(सरकार मान्य)
**अथर्व पेस्ट कंट्रोल**
An ISO 9001-15
**सर्टीफाईड कंपनी**
**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**
**9822964815**
**9421984815**
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

**पाहिजेत**

चिंचोळी MIDC, सोलापूर शहर करिता **सिक्युरिटी गार्ड** त्वरित पाहिजे.
संपर्क 9145451809
भेटण्याची वेळ – 11:30 ते 2 वा.

**वर–वधू**



**जन्मका जोडी विवाह दुल्हन सूचना केंद्र**


सभी जातियों के विरशैव लिंगायत वर–वधू के लिए सभी जातियों के प्रथं एवं द्वितीय वर–वधू के लिए हमसे संपर्क करे। मुस्लिम विवाह ब्रोकर, बंजारा और लंबाणी विवाह ब्रोकर, मुस्लीम मैरेज ब्रोकर, अंधीगर चौड़व्या मैरेज ब्रोकर, दनगर समाज मैरेज ब्रोकर, जय भीम समाज मैरेज ब्रोकर, वधू वर माहीती केंन्द्र

**आमच्याकडे सगळ्या समाजाच्या वधु–वर साठी संपर्क करा.**

मु.पो.पितापुर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर
**उमेश माने**
मो. 9353370779
**रेखा बर्वे**
मो. 7218370779


**वाचकांसाठी निवेदनः** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) नवी मुंबईतील राष्ट्रवादीतून भाजपवासी झालेले एक नेते २) विजेत्यास दिले जाणारे सन्मानचिन्ह, मेडल ३) पर्वा, चिंता ४) अवजड, बोजड ५) श्रीकृष्णाची माता ६) सश उलट लिहा ७) संजय दत्त अभिनीत एक चित्रपट, व्हिलन ११) गोमाता १२) बनावट, डुप्लीकेट १४) अंधार १५) संपत्ती, इस्टेट (हिंदीत) १६) जिंकणे, पराजयच्या विरूध्दार्थी १८) पुष्कळ, भरपूर १९) व्यक्ती २०) बॉडीगार्ड, किक चित्रपटाचा नायक २२) बारीकसारीक २४) महिना, माह २५) गरीबांचा फ्रिज, डेरा २७) एक उद्योगपती-*** टाटा २९) मनातील इच्छापूर्तीसाठी देवाला घातलेले साकडे ३०) पानाच्या विड्यात हा वापरतात ३१) ढग ३३) किमती वस्तू, ऐवज ३५) बेसन पीठ या द्विदल कडधान्यापासून बनते ३६) नवरा ३७) रूग्णालय ३८) दिवाळीत बनवितात ती तिखट व गोलाकार *** ३९) एक वनस्पतीजन्य तेल-**तेल ४०) तरचा साथीदार ४२) उमर (मराठीत) ४३) कोल्हापूरचे असलेले एक माजी मंत्री-विनय ** ४४) एक पेय, टी (मराठीत) ४५) एक हिंदी न्यूज चॅनल-आज **

**आडवे शब्द :** १) विधानसभेत पन्नास वर्षांहून जास्त काळ प्रतिनिधीत्व केलेले शेकापचे सांगोल्याचे दिवंगत आमदार ८) एक श्वसनरोग ९) एक तेल बी १०) आमीर खान अभिनीत एक चित्रपट १३) फलंदाजाने पूर्ण केलेल्या शंभर धावा १५) सीता १६) श्रीगणेशाचे एक नाव १७) नाना पाटेकर, मकरंद अनासपुरे यांची सामाजिक कार्य करणारी संस्था १८) तोटाच्या विरूध्दार्थी १९) सिंघम चित्रपटाचा नायक-*** देवगण २०) सैन्यातील प्रमुख शिलेदार २१) समाजवादी पार्टीचे निवडणूक चिन्ह २३) आश्चर्य, किमानच्या विरूध्दार्थी २५) मामाची बायको २६) फुलांची मोठी माळ, जीतच्या विरूध्दार्थी २८) कमी जास्त नसलेले, एकसारखे ३०) नदीचा तीर ३१) कष्ट, परिश्रम ३२) बुलढाणा लोकसभा मतदारसंघाच्या खासदार- **** राणा कौर ३३) एक मराठी महिना ३४) सूर्य, मुलगा (इंग्रजीत) ३५) निश्चित, खात्रीशीर ३६) क्षण (हिंदीत) ३७) पाच दुणे ३८) गव्हाच्या पिठापासून बनविलेली गोलाकार ४०) लष्करातील सैनिक ४१) उत्पत्ती, वभ उलट लिहा ४३) याचे सरबत बनवितात ४४) हाताने सूत कातण्याचे पूर्वी वापरले जाणारे चक्राकार साधन ४६) सोनिया गांधी यांचा मतदारसंघ ४७) तीन दुणे ४८) समीर भुजबळ या जिल्ह्यातील आहेत

## सुडोकु – 253

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 7 | 3 | | 9 | 5 | | | | |
| 2 | | | 6 | 7 | | 5 | 8 | |
| | | 5 | | 1 | | 4 | | |
| 1 | 9 | | | 6 | 3 | 2 | | 5 |
| | 4 | | | | | 6 | | |
| 5 | 6 | 8 | 2 | | 7 | | | |
| | 2 | | | 8 | 1 | 3 | | |
| | | 1 | | | 9 | 7 | 6 | |
| | 7 | | 5 | 2 | | 8 | | 9 |

# महामार्गबद्दल लोकांच्या मनात अनेक गैरसमज - आ. रणजितसिंह मोहिते पाटील

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** माढा मतदार संघातून जाणाऱ्या शक्तिपीठ महामार्गाला विरोध होण्याचे दोन प्रकार आहेत. काही लोक पैसे वाढवून मिळावे म्हणून विरोध करताहेत तर काही लोक रस्ताच नको म्हणून विरोध करत आहेत. या महामार्गबद्दल लोकांच्या मनात अनेक गैरसमज आहेत. मिळणाऱ्या मोबदल्यामधून सरकार 20 टक्के कपात करणार आहे. तर काही लोकांना वाटते आहे कि सरकार यातून जीएसटी कपात करणार आहे. संभ्रमात असलेल्या लोकांना, शेतकऱ्यांना शक्तिपीठ महामार्गची सद्यस्थिती, मिळणारा मोबदला, सर्व्हिस रोड, अंडरपास, रिंगरोड, जुनी, नवी आलाइनमेंट व इतर सर्व गोष्टीची माहिती व्हावी याकरिता व हा अंतिम सर्वे नाही. त्यामुळे लोकांनी घाबरून जाऊ नये. महामार्ग बाधित लोकांच्या समस्या जाणून घेण्यासाठी म्हणून शिवरत्न बंगला, यशवंतनगर -अकलूज येथे आज बैठक आयोजित करण्यात आली होती.



जेष्ठ नेते विजयसिंह मोहिते पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली व आमदार रणजितसिंह मोहिते पाटील, खासदार धैर्यशील मोहिते पाटील, आमदार उत्तमराव जानकर यांच्या अध्यक्षतेखाली या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी अर्जुनसिंह मोहिते पाटील, शिवतेजसिंह मोहिते पाटील, सयाजीराजे मोहिते पाटील, शक्तिपीठ महामार्गचा सर्वे केलेली मुनाच सर्वेअर कंपनी, पुणे चे अधिकारी, माढा मतदार संघातून आलेले बाधित शेतकरी, स्थानिक नेते मोठ्या संख्येने हजर होते.

शक्तिपीठ महामार्ग कोठून सुरु होतो. सोलापूर जिल्ह्यातील कोणकोणत्या तालुक्यातील किती गावे, किती एकर क्षेत्र बाधित होतेय यांची अभ्यासपूर्ण माहिती आ. रणजितसिंह मोहिते पाटील यांनी उपस्थिताना दिली. बाधित शेतकऱ्यांच्या असलेल्या समस्या अधिकाऱ्यांसमक्ष विचारण्यात आल्या. त्यावर सर्व्हेअर कंपनीच्या अधिकाऱ्यांनी समर्पक उत्तरे दिली.

> ही बैठक शेवटची नाही. मी लवकरच माढा मतदार संघातुन महामार्ग जाणाऱ्या सर्व गावाचा दौरा करून बाधित शेतकऱ्यांच्या समस्या समूजून घेणार आहे. त्या समस्या नंतर मी सरकार समोर मांडणार आहे.
> **- धैर्यशील मोहिते पाटील, खासदार**

> सरकारने बाधित शेतकरी, स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्याशी या महामार्गा विषयी चर्चा करावी. सरकार जर पोलीस बळाचा वापर करून जमीन घेण्याचा प्रयत्न करेल तर त्यास आम्ही कडाडून विरोध करू.
> **- उत्तमराव जानकर, आमदार**

रस्त्याच्या दोन्ही बाजूला भिंती आहेत. मग आम्ही आमच्या शेतात कुठून जाणार, पाईपलाईन कशी नेणार हा शेतकऱ्यांचा एक महत्वाचा प्रश्न होता. त्यावर उत्तर देताना अधिकारी म्हणाले, प्रत्येक 500 मीटर अंतरावर अंडरपास असणार आहे. पाईपलाईन नेण्यासाठी रस्त्याखालून डक ठेवण्यात येणार आहेत. सर्व्हिस रोडही असणार आहेत.

महामार्गाचा सर्वे 2023 साली झाला आहे. त्यानंतर त्या क्षेत्रामध्ये अनेक बदल झाले असतील. नवीन घरे, विहिरी, पाईपलाईन, झाडे लावली गेली असतील. अजून संयुक्त मोजणी झालेली नाही. वनखाते, कृषी विभाग, महसूल, इरिगेशन व इतर विभाग यांची पाहणी करून घर, झाडे व इतर गोष्टीचे वय ठरवतील व त्यानुसार पंचनामा होऊन मूल्यांकन करण्यात येईल. वर्ग 2 ची जमीन असेल तर 10 टक्के रक्कम कपात करण्यात येणार आहे.

शक्तिपीठ महामागाला त्या त्या भागातील रेडी रेकनर चा दर गृहीत न धरता सगळ्या जमिनीना सरसकट समान दर धरण्यात यावा. रेडी रेकनरच्या तफावतीमुळे खूप नुकसान होते आहे. नवीन झाडे लावलेल्यानाही नुकसान भरपाई मिळावी. ज्यांना आर्थिक मोबदला नको असेल अशांना एक एकर जमीन जात असेल तर नुकसान भरपाई म्हणून चार एकर जमीन दुसरीकडे मिळावी अशाही मागण्या शेतकऱ्यांकडून करण्यात आल्या.

सहमतीने जमीन दिली तर 2023, 24 व 25 मधील जो सर्वात जास्त रेडी रेकनरचा दर असेल तो देणार. आणी जर काही बाबींविषयी हरकत असेल तर चार पट दर देणार. हरकती मिटल्यानंतर राहिलेला एक पट दर देणार असल्याची माहिती सर्व्हेअर यांनी दिली.

# अकलूज येथे वीरशैव लिंगायत समाजाच्या वतीने गुणवंत विद्यार्थींचा सत्कार



**अकलूज (कटूसत्य वृत्त):** अकलूज येथे वीरशैव लिंगायत समाजाच्या वतीने मल्लिकार्जुन मंदिरात शनी जयंतीचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला.त्याच बरोबर वीरशैव लिंगायत समाजातील इयत्ता दहावी व बारावीत परीक्षेत सुयश मिळविलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ घेण्यात आला होता. यामध्ये सतरा विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. सकाळी शनी महाराज यांच्या मुर्तीची अभिषेक व महापूजा रविशंकर गुळवे यांच्या हस्ते संपन्न झाली व समाजातील दहावी बारावीच्या परीक्षेत यशस्वी झालेले विद्यार्थ्यांचा सत्कार समाजाच्या वतीने शाल,श्रीफळ,एक वृक्ष व प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.यामध्ये बारावी इयत्तेतील पाच विद्यार्थी व दहावी इयत्तेतील बारा विद्यार्थांचा सत्कार करण्यात आला.यावेळी वीरशैव लिंगायत समाजाचे पदाधिकारी व समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होत.या कार्यक्रमाच्या शेवटी समाजाच्या वतीने समाज बांधवांसाठी महाप्रसादाची (भोजनाची) उत्तम व्यवस्था करण्यात आली होती.

# औषध विक्रेत्यांचा २० मे रोजी देशव्यापी बंद

## केंद्र सरकारच्या भूमिकेविरोधात एआयओसीडी आक्रमक



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** केंद्र सरकारकडून प्रलंबित मागण्यांकडे सातत्याने दुर्लक्ष होत असल्याचा आरोप करत अखिल भारतीय औषध विक्रेता संघटना (एआयओसीडी ) ने दि. २० मे २०२६ रोजी देशव्यापी औषध विक्रेता बंदची हाक दिली आहे. या बंदला महाराष्ट्रातही शंभर टक्के प्रतिसाद मिळेल, असा दावा सोलापूर जिल्हाध्यक्ष व्यंकटेश पुजारी यांनी पत्रकार परिषदेत केला आहे .

ड्रग प्राईझ कंट्रोल ऑर्डर (डीपीओ)2013 अंतर्गत काही जीवनावश्यक औषधांवर होलसेलर व रिटेलरचा नफा निश्चित करण्यात आला आहे. मात्र, मोठ्या कॉर्पोरेट कंपन्यांकडून २० ते ४० टक्क्यांपर्यंत मोठ्या प्रमाणावर सवलती दिल्या जात असल्याने पारंपरिक औषध विक्रेत्यांपुढे गंभीर स्पर्धात्मक संकट निर्माण झाले आहे.

या कायद्यानुसार उत्पादकांकडून कडून काही जीवनावश्यक औषधीवर ८ टक्के होलसेलरला व १६ टक्के रिटेलरला, तसेच अनियंत्रित औषधीवर १० टक्के होलसेलर व २० टक्के रिटेलरला नफा निश्चित केला आहे. मात्र, मोठ्या कॉर्पोरेट कंपन्या अव्यवस्थित स्पर्धा निर्माण करून २० टक्के ते ४० टक्के पर्यंत डिस्काउंट देत आहेत. त्यामुळे देशातील सुमारे १२.५० लाख औषध विक्रेत्यांचा व्यवसाय धोक्यात आला असून अनेक दुकाने बंद होण्याच्या मार्गावर आहेत. देशातील सुमारे १२.५० लाख औषध विक्रेत्यांचा व्यवसाय धोक्यात आला असून अनेक मेडिकल दुकाने बंद होण्याच्या उंबरठ्यावर असल्याचा दावा संघटनेने केला आहे. त्यामुळे सरकारने नियंत्रित नफ्याच्या तरतुदीचा पुनर्विचार करावा तसेच डॉक्टरांनी लिहून दिलेल्या औषधाऐवजी औषध विक्रेत्यांना ब्रँड सबस्टिट्यूट औषधे देण्याचा अधिकार द्यावा, अशी प्रमुख मागणी केली आहे. संबंधित केंद्रीय मंत्री, प्रशासकीय अधिकारी तसेच पंतप्रधानांकडे वारंवार निवेदने देऊनही कोणतीही सकारात्मक दखल घेण्यात आलेली नाही. त्यामुळे संघटनेला आंदोलनात्मक भूमिका स्वीकारावी लागली आहे.

लोकशाही मागार्ने सातत्याने पाठपुरावा करूनही सरकारकडून प्रतिसाद न मिळाल्याने औषध विक्रेत्यांमध्ये तीव्र नाराजी आहे. सरकारने तातडीने न्याय्य निर्णय न घेतल्यास आंदोलन आणखी तीव्र करण्याचा इशाराही जिल्हा सचिव राजेश विरपे यांनी दिला आहे.

या पत्रकार परिषदेस प्रशांत खलिपे, बसवराज मणुरे,श्याम बाहेती, सिध्देश्वर घाळे, मनीष बलदवा, विलास कारभारी, सिध्दाराम चाबुकस्वार,अनंत चिटकुल, प्रताप कांचन आदी उपस्थित होते.

# छत्रपती संभाजी महाराज यांची मिरवणूक मोठ्या उत्साहात संपन्न

**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-** नामवंत धर्मवीर प्रतिष्ठान आयोजित धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज जन्मोत्सव सोहळा समितीच्या वतीने धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांची मिरवणूक मोठ्या उत्साहात व थाटामाटात संपन्न झाली. शिवकालीन पराक्रमाची आठवण करून देणारे थरारक सादरीकरण यामुळे संपूर्ण वातावरण शिवमय झालेले होते. विविध देखावे बघण्यासाठी शहरातील प्रमुख मार्गावर दुतर्फा गर्दी झालेली होती. छत्रपती शिवाजी महाराज की जय...! धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज की जय...! च्या जय घोषाने आसमंत दुमदुमला होता.



दरम्यान मिरवणुकीस प्रारंभ राजा शिव छत्रपती शिवाजी महाराज चौक येथून आई तुळजाभवानी माता, धर्मवीर शंभूराजे यांच्या पूजनाने, नगराध्यक्ष मिलन कल्याणशेट्टी, श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले, पंचायत समितीचे उपसभापती सागर कल्याणशेट्टी, पोलीस निरीक्षक दिपक भिताडे, उपनगराध्यक्ष ऋतुराज (बंटी) राठोड, सहाय्यक पोलीस निरीक्षक एन.बी. बागाव, नगरसेवक यशवंत धोंगडे, अविनाश मडीखांबे, तम्मामामा शेळके, नावेद डांगे, नन्नू कोरबू, सचिन शिंदे, मनोज निकम, इंजी. वरुण शेळके, प्रवीण देशमुख, सुहास सुरवसे, राहुल शेळके, अनिल मोरे, विजय लांडगे, शरणप्पा कापसे, विश्वजित पाटील, निखिल पाटील, प्रवीण घाडगे, धर्मवीर प्रतिष्ठानचे संस्थापक अतिश पवार, सिद्धाराम टाके, सिद्धाराम माळी, ऋषी लोणारी, निशांत कवडे यांच्या उपस्थितीत मिरवणुकीस प्रारंभ करण्यात आला.

या निघालेल्या मिरवणुकीत अंबारीत छत्रपती शिवाजी महाराजांची मूर्ती, सह्याद्री प्रतिष्ठान कराड आयोजित लाठी-काठी, तलवारबाजी तसेच कलारत्न फाउंडेशन मंगळवेढा यांचे 'गाथा स्वराज्य रक्षकाच्या बलिदान व स्त्री सुरक्षितता हीच खरी महाराष्ट्राची संस्कृती तर सातारा येथील कांतारा चित्रपटातील प्रसंगावर आधारित सजीव देखावे सादर करण्यात आले होते. आई तुळजाभवानी मातेचा भव्य देखावा असे विविध देखावे बघण्यासाठी शहरातील प्रमुख मार्गावर दुतर्फा गर्दी झालेली होती. कलाकारांनी साकारलेल्या या देखाव्यांनी मिरवणुकीत उत्साह निर्माण झालेला होता.

सदरची मिरवणूक राजा शिवछत्रपती शिवाजी महाराज चौक, बसस्थानक ते महर्षी वाल्मिकी मार्ग, विजय चौक, तारामाता चौक, कारंजा चौक, मेन रोड, वीर सावरकर चौक (तूप चौक), सेन्ट्रल चौक (सोन्यामारुती चौक), सजेर्राव जाधव पथ, समर्थ चौक, राजे फत्तेसिंह चौक येथे येऊन मिरवणुकीची सांगता करण्यात आली.

मिरवणूक यशस्वी करण्यासाठी संस्थापक अध्यक्ष अतिश पवार, भरत राजेगांवकर, देविदास गवंडी, सुरज भोसले, गणेश पाटील, प्रसाद मोरे, अजय वाझरे, दिनेश पाटील, लक्ष्मण शिंदे, राजाराम पवार, अभिषेक चव्हाण, शरद भोसले, आनंद पवार, सागर शिंदे, केदार तोडकर, धनंजय गडदे, लखन आवटे, सचिन बिराजदार, अमित कोळी, बसवराज भोळे, विष्णू गुंठे, रवी पोळ, मल्लिकार्जुन निलोगीकर, लक्ष्मण नागेशी, योगेश पवार, बसवराज स्वामी, प्रशांत बंदिछोडे, संकेत बिराजदार, अंबादास शिंदे, गौरव लोकापुरे, सुजल नरोणे, दत्ता मोरे, समर्थ नडगिरे, प्रसाद चव्हाण, समर्थ जामदार, अभिषेक कोळी, समर्थ वाघमारे, रुद्रा पाटोळे, सुरज जाधव, ओंकार तालीकोटे, राहुल तालीकोटे, कृष्णा नरवडे, किशोर ढंगे, आकाश मदने, प्रशांत पवार, विठ्ठल बोळकोटे आदिजनांनी परिश्रम घेतले.

### उत्कृष्ट नियोजन

धर्मवीर प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष अतिश पवार यांच्या कुशल नियोजनाने सदरची निघालेली मिरवणूक ही शिस्तबद्ध व सांस्कृतिक पद्धतीने पार पडली. समाजामध्ये ऐक्य, संस्कार आणि शिवप्रेम जागृत करण्याचा संदेश या मिरवणुकीतून देण्यात आला. उत्सव कसा असावा हे या माध्यमातून पाहायला मिळाल्याने शिवप्रेमीतून कौतुक व्यक्त होत होते. एक उत्कृष्ट नियोजनाचा नमुना या मिरवणुकीच्या माध्यमातून पाहायला मिळाला आहे.

# सोलापूर महानगरपालिका क्षेत्रात मोफत पाठ्यपुस्तकांचे आगमन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** समग्र शिक्षा अभियानांतर्गत राबविण्यात येणाऱ्या 'मोफत पाठ्यपुस्तक योजना सन २०२६-२७' चा सोलापूर महानगरपालिका क्षेत्रात श्रीगणेशा झाला आहे. महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ (बालभारती), पुणे यांच्याकडून पहिल्या टप्प्यातील पाठ्यपुस्तकांची वाहतूक सोलापूर मनपा मराठी केंद्र शाळा क्रमांक ६ येथे सुरक्षितपणे पोहोचली आहे.

नवीन शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीलाच विद्यार्थ्यांच्या हातात पुस्तके पडावीत या दृष्टीने प्रशासनाने वेगाने पावले उचलली आहेत. सोलापूर महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे, महापालिकेचे मुख्य लेखा अधिकारी तथा नियंत्रण अधिकारी डॉ. रत्नराज जवळगेकर आणि प्राथमिक शिक्षण मंडळाचे प्रशासन अधिकारी मल्हारी माने यांच्या थेट मार्गदर्शन व नियंत्रणाखाली ही मोहीम राबवली जात आहे.



### ७२ हजारांहून अधिक विद्यार्थ्यांना मिळणार लाभ

चालू शैक्षणिक वर्षात मनपा क्षेत्रात इयत्ता १ ली ते ८ वीच्या एकूण ७२ हजार ३६३ लाभार्थी विद्यार्थ्यांची नोंद झाली आहे. या सर्व विद्यार्थ्यांसाठी एकूण ४,५०,९८० पुस्तकांची मागणी नोंदवण्यात आली होती. त्यापैकी पहिल्या टप्प्यात सध्या ९५ हजार ते १ लाख पुस्तके प्रशासनाला प्राप्त झाली असून, उर्वरित पुस्तकेही लवकरच उपलब्ध होणार आहेत.

### ६ माध्यमांच्या ३२६ शाळांना होणार पुरवठा

सोलापूर शहरातील मनपा आणि खाजगी अनुदानित अशा एकूण ३२६ शाळांमधील विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळणार आहे. सोलापूरच्या बहुभाषिक संस्कृतीचा विचार करता ६ वेगवेगळ्या माध्यमांच्या शाळांमध्ये ही पुस्तके वितरित केली जातील.

**माध्यमनिहाय शाळांची संख्या खालीलप्रमाणे:**

- मराठी माध्यम: २१८ शाळा
- उर्दू माध्यम: ५२ शाळा
- कन्नड माध्यम: १४ शाळा
- तेलुगू माध्यम: ०३ शाळा
- हिंदी माध्यम: ०२ शाळा
- इंग्रजी माध्यम: ०२ शाळा
- एकूण: ३२६ शाळा

"विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्षाच्या पहिल्याच दिवशी पुस्तके मिळावीत यासाठी मनपा शिक्षण विभाग कटिबद्ध आहे. बालभारतीकडून पुस्तकांचा पहिला साठा प्राप्त झाला असून, त्याचे नियोजनबद्ध वितरण लवकरच सुरू करण्यात येईल. अशी माहिती प्रशासनाधिकारी मल्हारी माने यांनी दिली.

# युवक काँग्रेसचे भाजपविरोधात थाळी वाजवा आंदोलन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** पेट्रोल-डिझेल दरवाढ, परीक्षा पेपरफुटी प्रकरण आणि पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी खासदार प्रणिती शिंदे यांच्याबद्दल केलेल्या कथित आक्षेपार्ह वक्तव्याच्या निषेधार्थ सोलापूर शहर युवक काँग्रेसने रविवारी भाजप सरकार विरोधात जोरदार आंदोलन केले. भाजप कार्यालयाच्या दिशेने निघालेल्या युवक काँग्रेस कार्यकर्त्यांनी थाळी वाजवा आंदोलन करत पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय मंत्री धर्मेंद्र प्रधान तसेच पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या विरोधात घोषणा दिल्या. यावेळी युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष शिवराज मोरे, सोलापूर युवक काँग्रेस अध्यक्ष गणेश डोंगरे यांनी सरकारवर टीका केली.



# महापौर कोंड्याल ई-बाईकवरून महापालिकेत दाखल

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी इंधन बचत, पर्यावरण संवर्धन आणि शाश्वत जीवनशैलीचा अवलंब करण्याबाबत केलेल्या आवाहनाच्या अनुषंगाने सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने विविध पर्यावरणपूरक उपाययोजना राबविण्यात येत आहेत. युद्धजन्य परिस्थितीमुळे पेट्रोल, डिझेल व इतर इंधनाचा काटकसरीने आणि गरजेपुरता वापर व्हावा, तसेच वाढते वायू प्रदूषण आणि जागतिक तापमानवाढ यावर नियंत्रण मिळवण्यासाठी सोलापूर महानगरपालिकेने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. या उपक्रमाचा एक भाग म्हणून सोलापूर महानगरपालिकेतील सर्व पदाधिकारी, अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठी दर सोमवार हा दिवस 'नो व्हेईकल डे' म्हणून घोषित करण्यात आला आहे. या दिवशी खाजगी तसेच शासकीय वाहनांचा वापर टाळून सार्वजनिक वाहतूक, सायकल, ई-वाहने किंवा पायी कार्यालयात येण्यास प्राधान्य देण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या उपक्रमाला प्रत्यक्ष कृतीतून पाठिंबा देत महापौर विनायक कोंड्याल हे ई-बाईकवरून सोलापूर महानगरपालिकेत दाखल झाले. यावेळी त्यांनी महापालिकेतील पदाधिकारी, नगरसेवक, नगरसेविका, अधिकारी, कर्मचारी तसेच सोलापूर शहरातील नागरिकांनी या उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदवावा, असे आवाहन केले. यावेळी महापौर विनायक कोंड्याल म्हणाले की, 'पर्यावरणाचे संरक्षण आणि इंधन बचत ही केवळ शासनाची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांनी दिलेल्या संदेशानुसार आपण सर्वांनी पर्यावरणपूरक जीवनशैली स्वीकारणे काळाची गरज आहे. 'नो व्हेईकल डे' हा उपक्रम फक्त एक दिवसापुरता मर्यादित नसून भविष्यातील पिढ्यांसाठी स्वच्छ आणि निरोगी वातावरण निर्माण करण्याचा संकल्प आहे. सोलापूरकरांनी या मोहिमेला सकारात्मक प्रतिसाद देऊन शहराला प्रदूषणमुक्त करण्यासाठी सहकार्य करावे.'



महापालिकेच्या या निर्णयामुळे इंधन बचत, वाहतूक कोंडी कमी होणे, वायू प्रदूषणावर नियंत्रण आणि नागरिकांमध्ये पर्यावरण जनजागृती निर्माण होण्यास मोठी मदत होणार आहे.

सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने सर्व नागरिकांना या विधायक उपक्रमात सहभागी होऊन देशहितासाठी आणि पर्यावरण संवर्धनासाठी आपले योगदान देण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# महानगरपालिकेत नगरसेवक-नगरसेविकांना ओळखपत्र व बॅच बिल्ल्यांचे वितरण

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने महापौर विनायक कोंड्याल यांच्या शुभ हस्ते तर उपमहापौर सौ. ज्ञानेश्वरी देवकर तसेच सभागृह नेते नरेंद्र काळे यांच्या प्रमुख उपस्थिती महानगरपालिकेतील उपस्थित नगरसेवक व नगरसेविकांना अधिकृत ओळखपत्र तसेच बॅच बिल्ल्यांचे वितरण करण्यात आले. हा कार्यक्रम महापालिका मुख्यालयात उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.



यावेळी नगरसेवकांना त्यांच्या पदाची अधिकृत ओळख दर्शविणारे ओळखपत्र आणि बॅच बिल्ले प्रदान करण्यात आले. यामुळे महानगरपालिकेच्या विविध बैठका, कार्यक्रम तसेच प्रशासकीय कामकाजामध्ये लोकप्रतिनिधींची ओळख अधिक सुलभ होणार आहे.

महापौर विनायक कोंड्याल यांनी यावेळी सांगितले की, 'नगरसेवक हे नागरिक आणि प्रशासन यांच्यातील महत्त्वाचा दुवा आहेत. ओळखपत्र व बॅच बिल्ल्यांमुळे लोकप्रतिनिधींच्या कार्यास अधिकृतता व सुसूत्रता मिळणार असून नागरिकांमध्ये विश्वास अधिक दृढ होईल.' या कार्यक्रमास महानगरपालिकेचे अधिकारी, कर्मचारी तसेच मोठ्या संख्येने नगरसेवक व नगरसेविका उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन प्रशासन विभागाच्या वतीने करण्यात आले होते.

# सुरज देशमुख यांच्या वाढदिवसानिमित्त वृध्दाश्रमाला धान्य व फळ वाटप

**टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त):-** राष्ट्रवादी युवक कॉग्रेस (श.प) पक्षाचे जिल्हाध्यक्ष सुरज देशमुख यांच्या वाढदिवसानिमित्त नाना-भैय्या युवा मंचाच्या वतीने गोविंद वृध्दाश्रम येथे धान्य व फळ वाटप करण्यात आले. सुरज देशमुख यांनी नेहमीच सामाजिक उपक्रम राबवित समाजाचे हित जोपसले आहे. त्यांचे विचार आणि आदर्श डोळ्यासमोर आमच्या मित्रपरिवाराने आज त्यांच्या वाढदिवसानिमित्त वृध्दाश्रमातील लोकांसाठी गहू,तांदूळ तसेच फळे वाटप करण्याचा निर्णय घेतला. या उपक्रमाबद्दल वृध्दाश्रमातील लोकांकडून समाधान व्यक्त करण्यात आले. यावेळी सोमनाथ कदम, गणेश केचे, यशपाल लोंढे, नामदेव खुळे, माणिक कदम, सुरेश देशमुख, प्रताप देशमुख, अशोक वाघमारे, बापूसाहेब शिंदे, बाळासाहेब देशमुख, ग्रा.प. सदस्य शैलेश ओहोळ, वैभव महाडिक-देशमुख, अप्पा हवलदार, प्रशांत देशमुख, लखन माने, बिटू केचे, शारंग गायकवाड, विशाल मस्के, शरद इंगळे, नाना भोसले, आकाश सुतार, अशोक कांबळे, अदित्य देवकर, बालाजी महाडिक, आकाश पिसाळ, प्रथमेश थोरात उपस्थित होते. आभार दशरथ देशमुख यांनी मानले.



# लोकमंगल कृषीजैवतंत्रज्ञान महाविद्यालयाचे रानमसले येथे प्लास्टिकमुक्त परिसर अभियान

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** श्रीराम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान संचलित लोकमंगल कृषीजैवतंत्रज्ञान महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून समृद्ध गाव योजनेंतर्गत मौजे रानमसले ता. उत्तर सोलापूर येथे प्लास्टिकमुक्त परिसर अभियान राबविले. या उपक्रमांतर्गत रासेयो स्वयंसेवकांनी रानमसले येथील श्री ब्रह्मगायत्री मंदिर परिसरात स्वच्छता केली तसेच मंदिर परिसरातील प्लास्टिक गोळा केले. त्याचबरोबर त्यांनी मंदिरा परिसरात चाफ्याच्या दोन झाडांचे वृक्षारोपण केले. याप्रसंगी महाविद्यालयाचे रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. आशिष सरकाळे व प्रा सायली बडेकर तसेच सर्व स्वयंसेवक उपस्थित होते. या उपक्रमासाठी रानमसले गावचे सरपंच मनोहर क्षीरसागर व उपसरपंच रमेश सुतार तसेच सर्व ग्रामपंचायत सदस्य यांचे मोलाचे सहकार्य लाभले. या अभियानासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य सागर महाजन तसेच संस्थेचे अध्यक्ष रोहन देशमुख व सचिव डॉ.अनिता ढोबळे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

